
# समरसता

साहित्य पत्रिका

वर्ष ६, अंक १०, जून २०२६






कोणत्याही क्षणी
येता आठवण
मारावी ती हाक
तुजलागी...

दुजा कोणाचाही
नाही भरवसा
कोणा फुरसत
आहे सांग...

जो तो गुंतलेला
अपुल्या गुंत्यात
गुंतलेली तूही
तरी येसी...

चोवीसही तास
एका हाकेवर
मनही जाणशी
न बोलता...

कौतुक तुझे गं
किती सांगू आता
श्रीपादाचा भार
तुझ्यावर...

**श्रीपाद कोठे**

**ओला पक्षी**

रात्रभर
उशाशी एक पारवा थरथरत होता....
खिडकीच्या काचेवर
कुणाचे श्वास धुके बनून उतरले,
आणि अंधारात
माझ्या छातीवर उतरू लागली धूसर वर्तुळे
पावसा सोबत कोसळणारी
तुझ्या गडद स्पर्शातली वीज
काळ्या कभिन्न अंधाराला
चिरुन जात लकाकुन गेली माझ्या देहाला
किती तो पावसाचा जोर ?
घुसळणाऱ्या दोन सावल्या
चंद्राच्या पाण्यात डोलत होत्या.
पहाटेत विरघळणारी रात्र...
कसला आवाज हा?
खोलीत अजूनही
तुझ्या श्वासाचा
एक ओला पक्षी अडकलेला होता.....

**– सुनील ढेंगळे**

**मनातला पाऊस**

मन पाऊस पाऊस
चिंब अंगण–ओसरी,
कुंद गारव्याची हवा
गंध मातीचा पसरी...!

मन पाऊस पाऊस
पाणी डोळ्यांच्या डोहात
अवखळ ओघळते
मंद हवेच्या झोकात...!

मन पाऊस पाऊस
थेंब थेंबाने रुजतो
ध्यास रुजे त्याच्यासवे
कोंब आशेला फुटतो...!

मन झिम्माड पाऊस
आठवांची बरसात
माझ्या काजळात ओल्या
फुले उद्याची पहाट...!

असे चित्र पावसाचे,
जणू इवला कोलाज
साऱ्या आठवणी खुळ्या
त्यात मावल्या सहज...!

मन पाऊस पाऊस
म्हणे कसा बरसला?
सखे मनातच होता
तुला आज गवसला...!

**मानसी.**

# समरसता
साहित्य पत्रिका

**वर्ष ६, अंक १०, जून २०२६**

**संपादक**
रवींद्र गोळे
**संपादक मंडळ**
प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे
डॉ. रमा गर्गे
प्रा. गजानन होडे
**प्रकाशक**
**समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र**


**अंतरंग**


| | |
|---|---|
| स्त्रीमुक्तीचे पुरस्कर्ते : ज्योतिबा फुले | ४ |
| संन्यस्त खड्ग : अहिंसेचे तत्त्वचिंतन | ७ |
| तीन समकालीन स्त्रियांचे ललितबंध | ११ |
| ग्लोबल वारीच्या निमित्ताने... | १४ |
| व्यंकटेश माडगूळकर यांच्या विविधांगी लेखनाचे संदर्भ | १७ |
| ज्ञानरंजक 'पिवळीधमक सगुणाबाई' | २० |
| हमरस्ता | २४ |
| समर्पण जगण्याचा आलेख | २६ |
| गावची जत्रा भानगडी सतरा | २८ |
| डोंबारी (कोल्हाटी) समाज | ३० |

**कविता :**
श्रीपाद कोठे, सुनील ढेंगळे, मानसी



**मुखपृष्ठावरचे चित्र**
**अंतरजालावरून साभार**

**मांडणी/अक्षरजुळणी आस्वाद प्रकाशन**



**संपर्क : संपादक समरसता साहित्य पत्रिका**
**१/६ जैन इस्टेट, विलेज रोड,**
**भांडूप (प.), मुंबई – ७८**
**इमेल :** samarastaedit@gmail.com



**खाजगी वितरणासाठी**





या अंकाचे काम करताना आषाढी वारीचा सांगावा आला आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित म्हणून आपण पंढरपूरच्या वारीकडे पाहत असतो. केवळ ईश्वरभक्तीच नव्हे तर सामाजिक समरसतेचे उच्चतम उदाहरण म्हणून गेली अनेक शतके आपण आषाढी वारी अनुभवत आहोत.

महाराष्ट्रातील संत मंडळाने जातिभेदाच्या पलीकडे जाऊन 'सर्वांठायी एकच ईश्वरी अंश' हे समरसतेचे मूळ तत्त्व कृतीतून साकार केले. 'खट नट यावे शुद्ध होऊनिया जावे' असा दंगोरा चोखोबांनी पिटला तो याच भक्ती परंपरेतून. सर्वसमावेश अशी ही वारी कालातीत आहे. हजारो वर्षांची परंपरा असूनही ती नित्य नूतन आहे. लहानपासून थोरांपर्यंत सर्वांना वारीचे आकर्षण वाटते ते याच कारणामुळे. समता, समरसतेचा जीवनानुभव देणारी ही पंढरीची वारी आयुष्यात एकदा तरी करावी, अशी आस प्रत्येक हिंदू बांधवाला लागून राहिलेली असते ती वारीतील अंगभूत आत्मीय व्यवहारामुळे. येथे प्रत्येक जण हा 'माऊली' असतो. नाम, रूप, भाषा, प्रांत या बाह्य भेदांना दूर सारून आंतरिक एकतेची प्रेरणा जागवण्याचे काम वारी करते. वारी म्हणजे ऊर्जा, संवेदनशीलतेला जागृत करणारी, कार्यप्रवण करणारी. या ऊर्जेचा ज्यांनी अनुभव घेतला त्याचे जगणे सफळ, सुफळ झाले.

महा समन्वय म्हणून ओळखली जाणारी ही वारी आपल्या जाणिवा समृध्द करो आणि समरसतेची अनुभूती आपणास लाभो, हीच प्रार्थना.

**– रवींद्र गोळे**




# स्त्रीमुक्तीचे पुरस्कर्ते : ज्योतिबा फुले

**ज्योतिरावांचे नाव ज्योती. या ज्योतीने सामाजिक समता, मानवता व विवेकवाद यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखवला. एकूणच महात्मा फुले हे महाराष्ट्राच्या इतिहासातील श्रेष्ठ समाजसुधारक. शिवाय समाज व धर्मचिंतक ठरतात आणि मुलगामी समाजपरिवर्तनाचे ते आद्य प्रवर्तक ठरतात. कारण १९ व्या शतकात महाराष्ट्रात जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, रानडे, आगरकर, विष्णुशास्त्री पंडित आदी समाजसुधारक होऊन गेले. पण त्या सर्वांच्या पुढे जाऊन सर्व थरातील स्त्री दास्य मुक्तीसाठी फुलेंनी प्रयत्न केला हे त्यांचे वेगळेपण ठरते.**

**स्नेहलता स्वामी**

७७२१८२९७८०

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्यांना गौतम बुद्ध व संत कबीर यांच्याबरोबर गुरुत्वाची पदवी दिली, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी ज्यांचा गौरवाने उल्लेख 'समाज क्रांतिकारक'म्हणून केला तर महात्मा गांधी यांनी ज्यांना 'खरा महात्मा' म्हणून गौरविले असे आधुनिक भारताचे पहिले महात्मा व पहिले सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांची ओळख संपूर्ण जगाला स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून आहे, तसे स्त्रियांचे स्वातंत्र्याचे आणि हक्काचे उद्गाते, शेतकरी नि कामकरी यांच्या दुःख व दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे, जातीभेदावर हल्ला चढवून समानतेची घोषणा करणारे लोकनेते म्हणून आहे. महात्मा फुले यांचे स्त्री उद्धारकर्ते म्हणून असलेले कार्य विशेष उल्लेखनीय असे ठरते. कारण जो समाजातील सर्वात शेवटच्या थरासाठी त्याचे महत्त्व ओळखून काम करतो तोच खरा समाजसुधारक ठरतो, असे माझे वैयक्तिक मत असून त्याकाळी स्त्री ही सर्वात दयनीय अवस्थेत जीवन जगत असता त्यांच्या स्थितीचा व गतीचा विचार करून ज्यांनी विचार मांडले व कार्य केले त्यात अग्रभागी मला सत्याच्या वाटेवर निर्भीड चालणारे समाजसुधारक मा. ज्योतिबा फुले दिसतात.

आजच्या युगात स्त्रीशिक्षणाविषयी आता कोणतेही मतभेद वरकरणी पाहता फारसे नाहीत. अगदी शालेय शिक्षणाबाबत तर ग्रामीण भागातही असे भेद उरले नाहीत, असे आपण म्हणत असलो तरी उच्च शिक्षण व काही वंचित समूहात हे चित्र आजही बदलले नाही असे दिसते. यावरून त्यावेळी हे चित्र किती भयानक व काय स्वरूपाचे असावे याची आपणास

कल्पना येते. महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुलींची पहिली शाळा १८४८ रोजी काढली त्यानंतर सावित्रीबाईंसह घर सोडावे लागले. म्हणून आर्थिक अडचणीमुळे ती बंद पडली. पुढे १८५२ रोजी त्यांनी अस्पृश्यासाठी शाळा काढली. त्यावेळी न्या. रानडे हे १० वर्षाचे होते, तर समाजसुधारणा आधी करावी म्हणणारे गो. ग. आगरकर आणि स्त्री शिक्षणासाठी विद्यापीठ स्थापन करणारे महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्मही झाला नव्हता. स्त्रियांना शिक्षण नव्हते. त्यातही दलित वा तत्कालीन शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्रिया तर शिक्षणाच्या बाराखडीपासून कोसो मैल दूर होत्या. मध्ययुगीन काळात भारत एका अंधकार युगात वावरत होता आणि याचे विश्लेषण करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनीही समाजाची अवनती होण्याचे कारण ओळखले आणि त्यांच्या निदर्शनास आले एक सूत्र ते म्हणजे–


**गुरुणां माता गरीयसी**

अर्थात माता ही सर्वात मोठी गुरू आहे. आणि याची प्रचीती त्यांना आली व एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब पुढे जाते. दोन्ही कुळांचा उद्धार स्त्री करू शकते, असे ते म्हणत आणि अनेक वर्षांपासून, परकीय आक्रमण अत्याचारामुळे स्त्री शिक्षण बंद झाल्याने भारतीय समाजाची ही अवस्था झाली आणि ह्यात बदल करायचा असेल तर स्त्री शिकली पाहिजे, हा विचार त्यांनी पक्का केला. स्त्री ही घरातील मुलांचे संगोपन करते, सर्वांची देखभाल करते. तीच घरची वैद्य असते आणि गुरु, मित्र, मार्गदर्शकही आणि या भूमिकेत वावरणारी स्त्री शिकली तर समाजाची प्रगती होईल ही त्यांची धारणा. यांना शिकवणार कोण? आणि त्यांनी स्वतःच्या कुटुंबापासून समाज सुधारणेची सुरुवात केली.

सावित्रीबाईना शिक्षण दिले व त्या पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून पुढे आल्या आणि स्त्री शिक्षणाची दारे उघडली. आधी केले, मग सांगितले म्हणून ते राष्ट्र पुरुष झाले, असे म्हणावयास हरकत नाही.

पण हेही काही सहज सांगावे तसे सोपे मुळीच नव्हते याची जाणीव आपणा सर्वांना निश्चितच आहे. समाजाची वैचारिक प्रगती हा काही लगेच तत्काळ होणारा बदल नाही. तर त्यासाठी अनेक वर्षं सातत्याने झटावे लागते. तेव्हा कुठे मुंगीच्या पावलांनी हे बदल होतात. स्त्री शिक्षणाचा ध्यास घेऊन त्यांनी पुण्यात बुधवार पेठ, रास्ता पेठ, वेताळ पेठ येथे अनुक्रमे ३ शाळा काढल्या आणि स्त्री शिक्षणाचा श्रीगणेशा झाला.

स्त्री आणि पुरुष दोघे एकाच ईश्वराची लेकरे. मग दोघांत



भेद का? निर्मिकाने तर दोघांना सर्व मानवी अधिकाराचे धनी केले आहे.असे ते म्हणत. त्यांच्या सद्सदविवेकबुद्धीला ही विषमता सातत्याने बोचत असे. समता तत्त्वासोबत स्वातंत्र्य व बंधुता हे तत्त्व त्यांनी हिरीरीने मांडले. सत्सार या दोन पुस्तकातून व सार्वजनिक सत्य धर्म या पुस्तकात बळवंतराव व जोतिराव सवांदात ते स्त्रियांच्या दर्जासंबंधी विधान करताना ते म्हणतात, सर्व प्राण्यात माणूस श्रेष्ठ तर माणसात स्त्री श्रेष्ठ. पुरुषांनीच स्त्रियांना त्यांचे हक्क समजू दिले नाहीत. विद्या शिकण्यापासून वंचित ठेवले, असा आरोपही ते करतात. तर स्त्रीबद्दल विधान करताना ते म्हणतात, स्त्री ही त्यागी, प्रेमळ, सहनशील, कर्तव्यदक्ष आहे. स्त्री ९ महिने मुलाचे ओझे वागवते, मुलास लहानाचे मोठे करते, चालायला बोलायला शिकवते. त्यामुळे आईचे उपकार फिटत नाहीत. स्त्री घरात असल्याशिवाय घराला शोभा नाही. स्त्री ही पुरुषांप्रमाणे मानवी हक्क उपभोगण्यासाठी लायक असता पुरुषप्रधान संस्कृतीतील निर्बंधामुळे तिला मानवी हक्क उपभोगता येत नाहीत, हा एक सामाजिक अन्याय आहे, असे मत त्यांनी परखड मत मांडले. त्यामुळे स्त्रियांवर जुलूम, अन्याय करणाऱ्या पद्धती, रूढी याबाबत फुले खूप खोलवर जाऊन विचार करतात. समाजात जेव्हा ५०–६० वर्षे वयाच्या पुरुषाशी अज्ञान मुलीचे लग्न होताना ते पाहत, त्यावेळी त्यांचे मन पिळवटून जाई. बाल–जरठ विवाहास त्यांनी विरोध केला व याचे दुष्परिणाम म्हणून बालविधवा संख्या समाजात वाढून स्त्रियांच्या दु:स्थितीस सुरुवात होत असल्याचे ते एका वैद्याप्रमाणे समाजरोग

विश्लेषण करतात. बालविवाहाचाही त्यांनी विरोध केला व विवाह हा एक पवित्र करार असून वधू-वराचे वय किमान १८ वर्षे असावे, असे मत त्यांनी मांडले. याचे कारण देताना ते म्हणतात, स्त्री-पुरुषांची शारीरिक, मानसिक वाढ पुरेशी झालेली नसताना होणारे बालविवाह त्यांच्या प्रकृतीला हानिकारक आहेत. तसेच होणाऱ्या संततीलाही त्याचे परिणाम भोगावे लागतात, असे त्यांनी लिहिले. बेहरामजी मलबारी या समाजसुधारकांनी बालविवाह आणि लादलेले वैधव्य या विषयावरची दोन टिपणे मे, जून १८८४ मध्ये व्हॉइसरॉय लॉर्ड रिपन यांच्याकडे पाठविली होती. ती रिपनने प्रांतीय सरकारकडे व काही भारतीय पुढारी यांच्याकडे पाठविली. त्यात फुले, लोकहितवादी, न्या. म. गो. रानडे यांनी सदर सामाजिक सुधारणा सरकारने कायदा करून घडवून आणावी, असे मत मांडले व आपला अभिप्रायही दिला. त्यात महात्मा फुले नमूद करतात की, सरकारला न जुमानता अल्पवयीन मुलामुलींचे विवाह साजरे करणाऱ्या मातापित्यांकडून दंड म्हणून कर वसूल करावा आणि अशी रक्कम शिक्षणासाठी वापरावी. नियोग पद्धतीवरही त्यांनी टीका केली. बहू पत्नित्वाच्या पद्धतीवरही जोरदार टीका केली. पत्नी कधी आपल्या पतीस सवता का आणत नाही? असा उपरोधिक सवाल ते समाजास विचारतात आणि पती सती का जात नाही, असे ते विचारून सतिप्रथेस तीव्र विरोध करतात. सक्तीच्या वैधव्यावरही त्यांनी टीका केली. केशवपन, दागदागिने वापरता न येणे, आहार बंधने आदी अत्यंत अमानवी कृत्य असल्याचे मत त्यांनी मांडले आणि या विचारांना कृतीची जोड देण्यासाठी त्यांनी मुंबईत न्हाव्याच्या परिषदेत केशवपन न करण्याचा ठराव त्यांनी पास करून घेतला. न्हाव्यानी केशवपन करू नये, असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले. विधवा किंवा तरुण मुली ज्यांना पती नसता संतती झाली अशी मुले कुठे तरी फेकून दिली जात आणि त्यात ही जेव्हा नवजात अर्भकाचा खून केल्याबद्दल एका स्वयंपाक करणाऱ्या स्त्रीस सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली तेव्हा त्यांचा हा कळवळा दाटून आला. देखवेना डोळा, म्हणुनी कळवळा येत असे, असे संत हृदय द्रवावे तसे त्यांचे हृदय हळहळले. त्यासाठी त्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह आपल्या घरीच स्थापन केले.

जिथे लिहिले होते, येथे सुरक्षित बाळंत व्हा. सर्व माहिती गुप्त ठेवली जाईल व मुलांचेही संगोपन केले जाईल. त्यावेळी त्यांच्या या कृतीस रा. गो. भांडारकर, बाबा परमानंद तुकाराम तात्या पडवळ यांचे सहकार्य लाभले. आणि पुढे याच प्रतिबंधकगृहात बाळंत झालेली काशीबाई यांच्या यशवंत या मुलास फुले दाम्पत्याने दत्तक घेतले. अशा गृहात जन्माला येणाऱ्या बालिकांसाठी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यास कोणताही सामाजिक डाग न लागण्यासाठी स्वतंत्र अनाथ बालिकाश्रमही त्यांनी त्यासाठी चालवला. पुण्याच्या सारसबागेत फुले यांनी एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला होता. पंडिता रमाबाई यांचेवर ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याबाबत लंडनहुन परतल्यानंतर अनेक वृतपत्रांनी जी आगपाखड केली, त्याचा समाचार त्यांनी सत्सार या पुस्तकात घेतला. याच तालमीत तयार झालेल्या ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुष तुलना हा ग्रंथ लिहिला. त्याबद्दलही त्यांच्या विचारांचे कौतुक फुले यांनी केले होते. सावित्रीबाई रोडे यांनी पुढे १९२७ साली सत्यशोधक समाजाच्या सेक्रेटरी म्हणून नेतृत्व केले.

एकूणच स्त्री शिक्षणाला महत्त्व देत स्त्रियांना समान हक्क मिळावेत असे ते म्हणतात आणि बालविवाह, बाला-जरठ विवाह, बहुपत्नीव, केशवपन, नियोग, वेश्यागमन, सक्तीचे वैधव्य आदी अनिष्ठ प्रथांवर कठोर हल्ला करतात. त्यामुळे एकूणच स्त्रीमुक्तीचे त्यांचे कार्य पाहता त्यांना स्त्रीमुक्तीचे पुरस्कर्ते असे म्हणता येईल. महात्मा ज्योतिबा फुले यांचे चरित्रकार धनंजय कीर म्हणतात की, ज्योतिरावांचे नाव ज्योती. या ज्योतीने सामाजिक समता, मानवता व विवेकवाद यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखवला. एकूणच महात्मा फुले हे महाराष्ट्राच्या इतिहासातील श्रेष्ठ समाजसुधारक. शिवाय समाज व धर्मचिंतक ठरतात आणि मुलगामी समाजपरिवर्तनाचे ते आद्य प्रवर्तक ठरतात. कारण १९ व्या शतकात महाराष्ट्रात जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, रानडे, आगरकर, विष्णुशास्त्री पंडित आदी समाजसुधारक होऊन गेले. पण त्या सर्वांच्या पुढे जाऊन सर्व थरातील स्त्री दास्य मुक्तीसाठी फुलेंनी प्रयत्न केला हे त्यांचे वेगळेपण ठरते. गोवर्धन पारिख यांच्या मते, १९ व्या शतकातील विचारवंतात व द्रष्ट्यांत अग्रपूजेचा मान ज्योतीरावांना द्यावा लागेल. तर लक्ष्मणशास्त्री जोशीच्या मते सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड करणारे ते पहिले पुरुष होत.

महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून ते ओळखले जातात.

एकूणच महात्मा ज्योतिबा फुले म्हणजे नव्या स्त्री युगाची सुरुवात करणारे ठरतात. त्यांच्या विचार व कार्य ज्योतीने स्त्रियांच्या जीवनातील अंधार दूर होऊन सत्य व ज्ञानाचा अविरत चालणारा सूर्य प्रत्येक स्त्री आज पाहत आहे व पुढेही पाहत राहील. तो अंखंड ज्ञानाचा दिवा लावणारे महात्मा ज्योतिबा फुले म्हणजे ब्रह्माण्डातील एका तेजाची शलाकाच होय.




# संन्यस्त खड्ग : अहिंसेचे तत्त्वचिंतन

**सावरकरांच्या नाटकातली पात्रे कर्तव्यतत्पर आहेत. वैयक्तिक सुखदुःखाला विसरून राष्ट्रकार्याला प्राधान्य देतात. शाक्य राष्ट्राचा पाडाव निश्चित आहे हे समजल्यावरसुद्धा, आपला पती वल्लभ शत्रूच्या ताब्यात आहे, हे जाणूनसुद्धा सुलोचना सूड घेण्याचे ठरवते. आपल्या पत्नीला मूर्च्छित अवस्थेत सोडून वल्लभ युद्धाचं रणशिंग वाजताच युद्धात उतरतो. सुलोचनाची दासी नलिनीसुद्धा कर्तव्य म्हणून युध्दात उतरते आणि वीरमरण पत्करते. विक्रमसिंह तर चाळीस वर्षांचा संन्यास सोडून हाती तलवार घेतो. ही सारी पात्रे सावरकरांचा अवतारच म्हणावी लागतील. सावरकरांनी आजन्म प्रेयसावर मात करून श्रेयसाची निवड केली आहे.**

**अश्विनी जांभेकर पितळे**
९९२२९५२२५८

कविता, नाटक, कादंबरी किंवा चित्रपट असो, या सर्व कलांना मानवी जीवनातील नाट्यच प्रेरणा देतं. आयुष्यात संघर्ष जितका जास्त, तितकं नाट्यही! स्वा. सावरकरांचे सगळे आयुष्याच एखाद्या महानाट्यासारखे, ज्यात पराकोटीचा संघर्ष, अनपेक्षित वळणं, त्याग आणि आत्यंतिक ध्येयनिष्ठा होती. सावरकरांनी एकूण तीन नाटकं लिहिली. १९२७ मध्ये 'उःशाप', १९३१ मध्ये 'संन्यस्त खड्ग' आणि १९३३ मध्ये 'उत्तरक्रिया.' रंगमंचाच्या चौकटीचा वापर समाजप्रबोधनाचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणून त्यांनी कसा केला, याचा वस्तुपाठ म्हणजे त्यांची नाटकं!

सावरकरांनी वयाच्या केवळ १४–१५ व्या वर्षी लोकमान्य टिळक आणि चाफेकर रानडे यांच्या गौरवार्थ एकांकी नाटक लिहिलं होतं. पण ते पडद्याआडच राहिलं. ते १९४३ साली सांगली येथे झालेल्या 'शतसांवत्सरिक नाट्य महोत्सवा'चे अध्यक्षसुद्धा होते. सावरकरांनी उपरोक्त तीनही नाटकं रत्नागिरीत स्थानबद्धतेत असताना लिहिली. ह्या नाटकांच्या निर्मितीची, विषयाची बीजं तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत आढळतात.

अस्पृश्यता निवारण आणि शुद्धी हा 'संगीत उःशाप' नाटकाचा विषय आहे. 'संगीत उत्तरक्रिया' म्हणजे उत्तर जिंकण्याची क्रिया जी माधवरावांच्या कारकीर्दीत मराठ्यांनी कशी पार पाडली, हा ह्या नाटकाचा विषय आहे आणि 'संन्यस्त खड्ग' ह्या नाटकात कर्म संन्यासापेक्षा कर्मयोग आचरण्याची आवश्यकता कशी अधिक आहे हे सिद्ध केलं आहे. अतिरेकी अहिंसा ही शाक्य राष्ट्राच्या विनाशाचं कारण कशी झाली हे



सावरकरांनी तर्कनिष्ठ पद्धतीने सांगितलं आहे. सावरकरांच्या 'हिंदुत्व' ह्या ग्रंथात 'संन्यस्त खड्ग' ह्या नाटकाची मुळं आढळतात. बुद्धाचं तत्त्वज्ञान सावरकरांनी अंदमानात असताना अभ्यासलं होतं. बौद्धधर्माच्या ऱ्हासाची कारणं आणि उणिवा याबद्दल बोलताना सावरकर म्हणतात, बौद्धधर्माच्या प्रसाराने राष्ट्राच्या पौरुषावर व राष्ट्रीय अस्तित्वावरच गदा आली. राष्ट्रातील उत्तमोत्तम माणसे बौद्ध धर्मात सामील झाल्याने शाक्य राष्ट्र समर्थ शत्रूला बळी पडले. अग्नी व खड्ग यांना उत्तर देण्याचे सामर्थ्य बौद्ध धर्मात नव्हते. तेव्हा विचारवंतांना आपले खड्ग पुन्हा निष्कोशितं करावे लागले. भविष्यकाळात संरक्षणाचा एकच मार्ग म्हणजे शौर्य आणि बल हेच होय ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झाली.

हे नाटक बौद्धकालावर आधारलेले असले तरी तत्कालीन राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारं आहे. म. गांधींच्या अहिंसावादावर टीका म्हणजे हे नाटक आहे.

प्रत्येक नाट्यांतर्गत संघर्ष असावा लागतो. ह्या नाटकातील हा संघर्ष दोन विचारसरणीमधला आहे. सेनापती विक्रमसिंह जो शस्त्र आणि कर्तव्याचे प्रतीक आहे आणि बुद्ध जे अहिंसा आणि संन्यासाचे प्रतीक आहेत त्यांच्यातील वादाने दाखवला आहे. संन्यासाश्रमात कामिनी, कृषी आणि कृपाण ह्यांचा त्याग करावा लागतो. परंतु हा त्याग राष्ट्राच्या दृष्टीने किती घातक आहे हे सांगणारी विक्रमसिंह याची काही वाक्ये अभ्यासण्यासरखी आहेत. जेव्हा बुद्धांनी त्यांच्या आठ नऊ वर्षांच्या मुलाला राहुलला भिक्षूसंघात समाविष्ट करून घेतले, ज्यास संन्यास किंवा संसार म्हणजे काय हेसुद्धा ठाऊक नाही त्यावेळी विक्रमसिंह म्हणतो, '...ते आठ वर्षांचे मूलही भिक्षूसंघात घेऊन शाक्यांच्या आसन्नमरण रजवंशाच्या लतेची ही शेवटची कलिकाही खुडून टाकलीत. सामंतकुळातसुद्धा सर्व उत्तम पुरुष संन्यस्त झाल्याने ह्या राष्ट्रात सद्गुणी आणि अभिजात बीजापासूनच होणारी उत्तम संतती खुंटली. दुर्गुणी आणि अपकृष्ट लोकांची संतती तेवढी वाढत राहिली. अशा स्थितीत उत्तम बीज तेवढे निवडून फेकून देऊन किडकी, सडकी, निकृष्ट बीजेच तेवढी पेरणाऱ्या शेतकऱ्याच्या पिकाची जी दुर्दशा होणार तीच ह्या शाक्य जातीची होणार!'

संन्याशाला कृषीत्याग करावा लागतो, कारण नांगराने अनेक जीव मरतात. यावर भाष्य करताना विक्रमसिंह म्हणतो, '...संन्यासी स्वतः अशी पापमय शेती करणार नाही; पण दुसऱ्याकडून ते पाप आचरवून ते पापांचे अन्न मात्र खाण्यास सोडणार नाही!'

कामिनी आणि कृषी यापेक्षा कृपणाच्या त्यागाने राष्ट्राची भयंकर हानी कशी होते हे सांगताना तो म्हणतो, 'भगवन, ही आत्यंतिक अहिंसा नसून हा आत्यंतिक आत्मनाश होय! आणि आत्म्याचा नाश हीही पुन्हा हिंसाच होत असल्याने आत्यंतिक अहिंसा म्हणजे आत्यंतिक हिंसा! असे अहिंसेच्या ह्या अनाडी व्याख्येचे विलक्षण तात्पर्य निघते!'

जेव्हा बुद्ध म्हणतात की, 'क्षमा' हे संन्याशाचं शस्त्र आहे, त्यावेळी विक्रमसिंह म्हणतो, दंड करण्याची ज्यास शक्ती नाही त्या दुबळ्याच्या क्षमेस शरणागती म्हणतात, शस्त्र नव्हे!

अशी अनेक वाक्ये संपूर्ण नाटकात आहेत. उदा. हिंसेची दंत, नखे शस्त्राने छाटून टाकते तीच अहिंसा होय! यावरून सावरकर किती उत्तम बॅरिस्टर होते हे लक्षात येतं.

असे असले तरी गौतम बुद्धांबद्दल सावरकरांना नितांत आदर होता हेसुद्धा नाटकातील काही प्रसंगांवरून दिसून येते. उदा. बुद्ध जेव्हा शुद्धोधन महाराजांना भेटायला नगरात प्रवेश करतात तेव्हा ते शृंगारलेला मार्ग सोडून बहिष्कृत अस्पृश्य वस्तीतून मार्ग काढत भिक्षा मागत येतात. किंवा एके ठिकाणी स्वतः बुद्ध म्हणतात, तथागत बुद्ध केवळ गुणावरून, शीलावरून माणसांची योग्यता ठरवतो; जन्मावरून नाही. एके ठिकाणी बुद्धांच्या योगदानाबद्दल सुद्धा सांगितले आहे. बुद्धांच्या साध्या, सोप्या आणि करुणामय उपदेशामुळे हजारो लोकांची जिवांची तळमळ शांत झाली आहे आणि यज्ञांमधला फोलपणा किंवा लोकांच्या मनावर देवतांचा असणारा पगडा

मोडून सदाचरण आणि लोकप्रेम हेच धर्मसाधन म्हणून बुद्धांनी प्रस्थापित केले, असेही विक्रमसिंह म्हणताना दिसतो. भिक्षू अडलेल्यांची सुटका करतात, मत्सर करू नका, दया करा क्षमा करा, असे संदेश पोचवतात. हे उपकार जग कधीही फेडू शकणार नाही, असेही सावरकर विक्रमसिंह यांच्या तोंडून वदवून घेतात. यावरून सावरकरांना हे सांगायचे आहे की, अहिंसा ही कितीही आदर्श असली तरी 'व्यवहार्य' नाही.

समीक्षा संज्ञा कोशामध्ये कृ. रा. सावंत नाटकाबद्दल लिहिताना म्हणतात की, नाटकाचा विषय नाटकाच्या रचनेत गर्भित असतो. पात्रांचे परस्परसंबंध, त्यांच्याशी निगडित असलेल्या कल्पना, संघर्ष आणि त्याची परिणती ह्यातून तो अभिव्यक्त होतो. काही नाटकात विषय उघडपणे स्पष्ट व्हावा अशी अपेक्षा असते. अशी नाटकं बहुधा समस्याप्रधान किंवा प्रचारकी असतात. सावरकरांच्या नाट्यलेखनामागे हाच हेतू होता. स्वामताचा प्रसार आणि प्रचार करण्याचं एक साधन म्हणून त्यांनी नाटकं लिहिली. त्यामुळे सावरकरांनी तंत्राला बगल दिलेली आहे. भरताच्या नाट्यशास्त्राप्रमाणे नाटकाचे कथानक प्रख्यात असावे, त्याचा नायक एखादा राजर्षी कुळातील किंवा दिव्यपुरुष असावा. वैभवाचे दर्शन त्यातून व्हावे, नाटक शृंगार किंवा वीररसयुक्त असावे. नाटकाचा शेवट विस्मयजनक व्हावा. ह्या कसोट्यांवर सावरकरांचं प्रस्तुत नाटक बसत असलं तरी भरताने रंगभूमीवर लढाया, खून किंवा मृत्यू दाखवणे वर्ज्य मानले आहे. तरीही शेक्सपियरच्या नाटकात शेवटी रंगमंच मृतदेहांनी भरलेला असतो तसेच सावरकरांच्या नाटकातही आढळतं. काही मृत्यू उगाचच केल्याप्रमाणेसुद्धा वाटतात. उदा. वल्लभ आणि सुलोचना यांचा मृत्यू! सावरकरांना शेवट सुखांत करता आला असता, मात्र हौतात्म्यात प्रेरक शक्ती असते जी जनतेला हलवते, असा विश्वास सावरकरांना होता.

'संन्यस्त खड्ग'च्या दोन अंकांत ४० वर्षांचे अंतर आहे. त्यामुळे प्रायोगिकदृष्ट्या हे नाटक मागे पडले. सावरकरांचा लेखणीचा विशेष म्हणजे सावरकर मोठी मोठी लांब पल्लेदार वाक्ये लिहितात. त्यांच्या नाटकात 'संवादापेक्षा वाद जास्त' असतो. महत्त्वाची, दुय्यम, सारीच पात्रे ही वादविवाद करताना, युक्तिवाद करताना दिसतात. ती सावरकरांचीच भाषा बोलताना दिसतात. विक्रमसिंह याच्या तोंडून स्वतःचे मत मांडायचे होते, त्यामुळे गौतम बुद्धांच्या वाक्यांना अगदीच कमी स्थान आहे. नाटकाच्या शेवटी 'धर्म' प्रकट होऊन विक्रमसिंहास सांगतो की, तो निर्वाणच्युत झाला नाही तर हौतात्म्याने निर्वाणपद प्राप्त करता झालाय; त्यावेळी सुद्धा सावरकरच बोलत असतात. या सर्वाचे मूळ सावरकरांच्या बुद्धिनिष्ठेमध्ये आहे. त्यांची राष्ट्रहितासाठी असलेली कळकळ त्यांच्या नाटकातील प्रत्येक वाक्यागणिक कळते.

सावरकरांनी त्यांच्या समग्र साहित्यात चितारलेल्या स्त्रिया ह्या अत्यंत कर्तृत्ववान, मेधावी आणि शूर, अगदी युद्धात सहभागी होणाऱ्या, शस्त्र चालवून शत्रूस जेरीस आणणाऱ्या आहेत. त्या पुरुषांशी युक्तिवाद करून प्रसंगी त्यांची निर्भर्त्सनासुद्धा करताना दिसतात. उदा. शाकंभटाची बायको क्षारा म्हणते, एकेका मुलीभोवती छप्पन्न देशींचे पुरुष गोळा होऊन स्वयंवराचा प्रतिष्ठित गुंडपणा जसा करतात, काय मारामाऱ्या, हाणाहाण्या, लट्ठालट्ठी... मेली मांजर–कुत्रीदेखील असली आपली निलाजरी भांडणे त्या तुमच्या सीतास्वयंवराहून नि रुक्मिणीस्वयंवराहून किंवा आमच्या सिद्धार्थ बुद्धाच्या यशोधरा स्वयंवराहून अधिक मर्यादेने भांडतात? तसे कधी पाचपन्नास स्त्रियांनी जमून एका पुरुषापुढे हलकट लाळघोटेपणा केला आहे का?

किंवा वल्लभाशी वाद घालताना सुलोचना म्हणते, '... ज्या अर्थी तुम्हीच म्हणता की, स्त्रिया ह्या बेड्या पुरुषांच्या पायात देवाने ठोकल्या; त्याअर्थी, पुरुष पूर्वजन्मीचे कोणीतरी तसलेच अट्टल पापीच असले पाहिजेत नाही का?' किंवा 'प्रत्येक निमित्ताने येता जाता आपल्या वर्तनाची परीक्षा देत बसायला स्त्रिया काही कोणी उपजत अपराधी नाहीत नि पुरुष काही उपजत न्यायाधीश नाहीत.'

सावरकरांच्या नाटकातील विनोद हा सावरकरांच्या प्रकृतीप्रमाणे बुद्धिनिष्ठ आहे. शाकंभट, ताकंसिंह, क्षारा, भिक्षुणी यांच्या संवादातून विनोदनिर्मिती होते. हा विनोद शब्दनिष्ठ आहे. उदा. अहिंसेची टवाळी करताना शाकंभट म्हणतो, 'आम्ही थापासदेखील ठोकीत नाही, चकाट्यांनादेखील पिटीत नाही, गप्पासदेखील झोडीत नाही, हाकेलादेखील मारीत नाही.'

सावरकरांच्या या नाटकातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील गीतं. 'संन्यस्त खड्ग' नाटकात कमीतकमी २५ गीतं आहेत. बहुतांशी गीतं ही अगदी २–३ ओळींची आहेत. 'माळ गुंफिताना । ऐका कवनाला ।' किंवा सर्वात प्रसिद्ध असलेलं, 'शत जन्म शोधिताना । शत आर्ती व्यर्थ झाल्या ।' ही दोनच गीतं मोठी आहेत. सावरकरांचा पिंड मुळात कवीचा आहे. प्रेमात सावरकर किती हळवे होतात हे पाहायचं असेल तर 'शत जन्म शोधिताना' जरूर ऐकावं. दीनानाथ मंगेशकर आणि पंडित वसंतराव देशपांडे ह्यांनी हे गीत अमर केलं आहे.

सावरकरांच्या नाटकातली पात्रे कर्तव्यतत्पर आहेत.

वैयक्तिक सुखदुःखाला विसरून राष्ट्रकार्याला प्राधान्य देतात. शाक्य राष्ट्राचा पाडाव निश्चित आहे हे समजल्यावरसुद्धा, आपला पती वल्लभ शत्रूच्या ताब्यात आहे, हे जाणूनसुद्धा सुलोचना सूड घेण्याचे ठरवते. आपल्या पत्नीला मूर्च्छित अवस्थेत सोडून वल्लभ युद्धाचं रणशिंग वाजताच युद्धात उतरतो. सुलोचनाची दासी नलिनीसुद्धा कर्तव्य म्हणून युध्दात उतरते आणि वीरमरण पत्करते. विक्रमसिंह तर चाळीस वर्षांचा संन्यास सोडून हाती तलवार घेतो. ही सारी पात्रे सावरकरांचा अवतारच म्हणावी लागतील. सावरकरांनी आजन्म प्रेयसावर मात करून श्रेयसाची निवड केली आहे.

शस्त्रपुरस्कार हा सावरकरांच्या नाटकाचा आणखी एक विशेष! 'संन्यस्त खड्ग' नाटकाचा विषयच अतिरेकी आणि एकांगी अहिंसा ही राष्ट्राच्या विनाशाचे कारण ठरते हा असल्यामुळे सावरकरांनी यात जोमाने शस्त्रपुरस्कार केला आहे. जेव्हा एखादे राष्ट्र स्वतःचे रक्षण करण्याचे सामर्थ्य म्हणजेच शस्त्र पूर्णपणे त्यागून केवळ अहिंसेचा मार्ग धरते, तेव्हा ते राष्ट्र परकीय आक्रमकांसाठी मऊ घास ठरते याची जाणीव सावरकरांना पुरेपूर होती. त्यामुळे 'बंदुका घेण्यास शिकवणारी नाटके लिहावीत' हा सावरकरांचा आग्रह होता. नाट्यकला ही लोकांना ध्येयाकडे नेण्यास प्रवृत्त करते. त्यामुळे सावरकरांनी नाट्यलेखन केलं. शिवाजी मंदिर, दादर येथे दिनांक १६–१–१९५४ रोजी नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर यांनी हे नाटक सादर केले तेव्हा, हे नाटक लिहिण्यामागचं प्रयोजन सांगताना सावरकर म्हणाले होते, २५०० वर्षांतील भारताच्या इतिहासावर बुध्दांच्या आत्यंतिक अहिंसेचा पगडा होता. आपल्या सामरिक असिद्धतेचा लाभ घेऊन शत्रूंनी आपल्याला पराजित केलं. गौतम बुद्धाच्या प्रयत्नांनंतरही जगातून हिंसाचार नष्ट झाला नाही. बुद्धाचे शिष्यत्व मानणाऱ्या जपानने आणि चीननेसुद्धा शस्त्रबलाचीच कास धरली. शेवटी ते म्हणतात, 'लक्षात ठेवा, हिटलरचा पराभव अहिंसेच्या उपदेशाने झाला नाही. तो रशिया–अमेरिका यांच्या संयुक्त झालेल्या सवाई शस्त्रबलाने केला. ख्रिस्त वा बुद्ध यांच्या उपदेशाने नव्हे!'

एकंदरीत सावरकरांची नाटकं ही अनुरंजनासाठी लिहिली नव्हती, तर ती लोकांच्या डोळ्यात अंजन घालण्यासाठी लिहिली होती. सावरकरांनी त्यांच्या नाटकातून जीवनादर्श दाखवण्याचे मोलाचे काम केले आहे.


**वाचकांच्या आग्रहास्तव नारायणी ग्रंथ पुनःप्रकाशित होत आहे.**


**•॥ नारायणी ॥•**

**प्रकाशन : ऑक्टोबर २०२४ किंमत : ६००/-रु. । सवलत मूल्य : ५००/-रु.**

विवेक प्रकाशन

अनन्य भक्तकुळांची स्वामिनी कोल्हापूरची **'श्री महालक्ष्मी'** म्हणजेच दक्षिणकाशीचे दर्शन या 'नारायणी' ग्रंथाद्वारे आपणास घडणार आहे. श्रीचे माहात्म्य, मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना, मुख्य मंदिरासह परिसर मंदिराचे रंगीत छायाचित्रं. उपासना विभागात श्री महालक्ष्मी स्तोत्रे, सूक्त, कवच, अथर्वशीर्ष, सहस्रनामावली, श्रीयंत्र माहिती व पूजाविधी, ऋषीमुनींनी केलेली स्तुती यांच्या पठणाने श्रद्धेची अनुभूती आपण घेणार आहोत. १२५-१५० रंगीत फोटोद्वारे श्री महालक्ष्मीची विविध रूपातील पूजा, सुवर्ण पालखी, रजत रथोत्सव, अत्यंत दुर्मिळ व पुरातन 'श्रीं' च्या अलंकाराचे मनोहारी दर्शन या ग्रंथाद्वारे घडणार आहे. दैनंदिन पूजा, करवीर यात्रा, नवरात्रोत्सव या सर्वांचे नयनरम्य दर्शन या ग्रंथाद्वारे आपणास होणार आहे.

असा परिपूर्ण ग्रंथ मान्यवरांनी नावाजलेला, शंकराचार्यांचा आशीर्वाद लाभलेला ग्रंथ पूर्णतः रंगीत आर्टपेपरवर पुनः प्रकाशित होत आहे.




Accounts details. - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318

संपर्क : ९५९४९६१८५८




# तीन समकालीन स्त्रियांचे ललितबंध

> 'मानवतेचे महन्मंगल गाणे' या भागात विविध व्यक्तींची त्रोटक स्वरूपाची व्यक्तिचित्रे आहेत! ती अपूर्ण, एखाद्या घटना-प्रसंगाशी निगडीत व त्रोटक स्वरूपाची झाली आहेत. इथेही शब्दसंख्या बंधनाने आघात केलेला दिसतो. बरेचसे लेखनविषय सहज-उत्स्फूर्तपणे न येता ठरवून, शोधून, योजून मांडलेले दिसतात. तरलता, भावपूर्णता, उत्स्फूर्तता, सहजता, अभिजातता, जिवंतपणा, चैतन्य, इ. गुणधर्म जे ललितनिबंधात असायला हवेत ते इथे जाणवत नाहीत!

**राजेंद्र नाईकवाडे**
९८५०३५१०२५

ललितबंध, ललित निबंध अथवा ललित गद्य हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार असून मराठी साहित्यात फडके–खांडेकर ह्यांच्यापासून ते श्रीनिवास विनायक कुलकर्णी – ग्रेसपर्यंत आणि पुढे नव्वदोत्तर काळातील मुक्त ललित लेखनापर्यंत ह्याचे विविध उपप्रकार प्रभावीपणे अभिव्यक्त झालेले दिसतात. आनंद यादवांनी मांडलेल्या संकल्पनेनुसार 'मीत्व' आणि 'विषयवस्तू' यांच्या एकत्रीकरणातून आकाराला येणारा, आत्मकथनात्म, मीत्वप्रधान, आत्मनिष्ठप्रधान असा हा वास्तवदर्शी वाङ्मयीन आकृतिबंध आहे. मीत्वाचे प्रमाण आणि विषयवस्तूचे प्रमाण यांच्या विशिष्ट स्वरूपाच्या मीलनातून, आठवणी–अनुभव, लघुनिबंध, प्रवासलेख, व्यक्तिचित्र आणि ललित लेख असे मीत्वाकडून विषयवस्तुकडे वाढत जाणाऱ्या प्रमाणाच्या अंगाने त्याचे विविध पाच उपप्रकारांत वर्गीकरण करता येते. बऱ्याच लेखनात ह्यांची सरमिसळही आढळून येते. आत्मकथनात्म ललित गद्य असे त्याचे एकंदर स्वरूप असते. विशेषतः हे 'मी'च्या अनुभवांचे शब्दांकन (विषयवस्तुप्रधान) असते. काव्यात्मता, अल्पाक्षरत्व, बहुश्रुतता, वास्तवप्रधानता, प्रथमपुरुषी एकवचनी निवेदनशैली, स्फुटत्व, चिंतनशीलता इ. या प्रकाराचे विविध गुणधर्म सांगता येतात.

वरील सर्व वैशिष्ट्यांच्या पार्श्वभूमीवर अलीकडे २०२३ मध्ये प्रकाशित खालील तीन ललितबंधसंग्रहांचा विचार आपण करीत आहोत.

१. गोंदणखुणा – डॉ. प्रिया निघोजकर
२. एक उलट एक सुलट भाग २ – अमृता सुभाष
३. सोकुल टेक २ – सोनाली कुलकर्णी

उपरोक्त तीन ललितबंधसंग्रहातील ललितबंधांविषयीची




माझी मूल्यांकनात्मक निरीक्षणे खालीलप्रमाणे –

**अमृता सुभाष यांचे ललितबंध**

ललितबंधाच्या उपप्रकारातील आठवणी–अनुभव आणि ललितलेख यात अमृता यांचे बहुतांशी लेखन समाविष्ट होते. प्रामाणिकपणाने आपले जीवनानुभव, अवतीभवतीचे आयुष्य निरागसपणे समजून घेण्याच्या असोशीने मांडलेले असल्याने त्यात एकप्रकारची उत्स्फूर्तता, सच्चेपणा आणि स्वाभाविकता आलेली दिसते. प्रसिद्धीच्या कुठल्याही वलयांचा प्रभाव आपल्या अनुभवांच्या मांडणीवर पडू न देता किंवा कुठलीही वैचारिक बांधिलकीची वा अन्य प्रकारची पोझ न घेता त्या आपल्या भावविश्वाला अचूक शब्दकळेतून साकार करीत जातात. मराठी साहित्य आणि अवतीभवतीच्या विविध घटना–प्रसंगांच्या आधारे आपले विचार, भावना आणि चिंतन त्यांनी मांडले आहे. त्यांच्या भावविश्वात आजी–आई–बाबा हे एक कौटुंबिक भावविश्व, दुसरे नाटक–सिनेमाचे भावविश्व आणि तिसरे समाजचिंतनाचे आणि वाङ्मयचिंतनाचे भावविश्व. या परिघात स्वाभाविकपणे त्यांचा हा आत्मशोधाचा प्रवास साकारत जातो आणि त्यांच्या ललितबंधाला एक स्वतंत्र आणि पृथगात्म स्वरूप प्रदान करतो. ललितबंधाचे व्यवच्छेदक लक्षण मीत्वप्रधानता हे असल्याने अमृता यांच्या लेखनात सतत स्वशोध वाचकांना जाणवत राहतो. हे त्यांच्या लेखनाचे एक बलस्थान मानले पाहिजे. सोबतच बहुश्रुतता, वाचनसमृद्धी, चिंतनशीलता, भावप्रधानता, काव्यात्मता इत्यादी गुणधर्मांनी हे लेखन तरल आणि संवेदनशील वाचकाला स्वतःकडे ओढून घेते. अवतीभवतीच्या कथित मॉडर्न मंडळींच्या पोझ घेतलेल्या सिनिक अन् नकारवादी दृष्टिकोणाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रकारच्या संघर्षातही एकूण जीवनाकडे बघण्याचा अमृताचा सकारात्मक आणि आशावादी दृष्टिकोण वेगळा उठून दिसतो. भारतीय परंपरांना समजून घेणारे व समजून घेऊन मग त्याच्या पलीकडे जाऊ पाहणारे संवेदनशील कलावंतमन इथे दिसते. हा परंपरा–नवतेच्या समन्वयाचा धागा अमृताच्या ललितलेखांना मराठीतील समृद्ध अशा ललितबंध–परंपरेशी जोडतो!

आकृतिबंधाच्या अथवा अभिव्यक्तीच्या अंगाने ज्या २९ ललितलेखांमधून आदी–मध्य–अंत अशी व्यवस्थित मांडणी त्या करतात. अर्थात ही मांडणी अनुभवांना किंवा चिंतनाला स्वाभाविकपणे प्राप्त झालेला आकार या अंगाने प्रकट होते. दोन ते तीन पानांच्या आकारात साकारलेले विविध विषयवस्तूंच्या केंद्राभोवती फिरणारे आठवणी–अनुभवांचे विश्व पुस्तकी व अलंकारिक शब्द–वाक्यशैलीऐवजी सहज–स्वाभाविक अशा अनुभवनिष्ठ, प्रसंगनिष्ठ ओघवत्या शैलीतून साकार होते हे अमृता यांच्या लेखनाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरते.

**सोनाली कुलकर्णी यांचे ललितबंध**


सोनाली कुलकर्णी यांच्या 'सोकुल टेक २' या ललितबंधसंग्रहात ८५ लेख असून ह्यांचा आकृतिबंध २–२ पानांचा असा अतिस्फुटलेखांचा आहे. ललितबंधाच्या आकृतिबंधाचे व्यवच्छेदक लक्षण हे मीत्वप्रधानता अथवा आत्मकथनात्मकता हे असल्याने त्यातून सोनाली यांचे व्यापक अनुभवविश्व अतिस्फुट रूपात साकार होताना दिसते. या पुस्तकात सोनाली यांच्या चित्रपटांची रंगीत

छायाचित्रे टाकून त्यांची लोकप्रियता व्यावसायिक अंगाने उपयोगात आणण्याचा प्रयत्न दिसतो, जो अशा पुस्तकांसाठी अनावश्यक ठरतो. ललितबंधाच्या उपप्रकारांचा विचार करताना हे लेखन आठवणी-अनुभव, लघुनिबंध व व्यक्तिचित्र या प्रकारात मोडते. ७४ ते ८५ या क्रमांकावर व्यक्तिचित्रे आली आहेत. त्यात व्यक्तिमत्त्वांचा समग्र शोध न घेता त्यांच्याशी आपल्या त्रोटक व सीमित संबंधांच्या गाठी उलगडल्या जातात. आशयसूत्राच्या अंगाने भूत-वर्तमान, बालपण-प्रौढत्व, गाव-शहर या दोन केंद्रांमधीत ताण, तुलना व अनुबंध मांडला जातो. हे ताणतणाव सुलभ, बाळबोध व सोपपत्तिक पद्धतीने मांडले जातात. उदा. दिवाळी बालपण दिवाळी वर्तमान दिवाळी इ. (आली माझ्या घरी..) गोळीबंद व आखीवरेखीव शैलीऐवजी सहज, ऐसपैस, संवादप्रधान अशी शैली लेखिका वापरते. 'खेळकरपणा' हा फडक्यांनी सांगितलेला लघुनिबंधाचा एक मध्यवर्ती विशेष डोळ्यापुढे ठेवून हे लेखन घडल्यासारखे वाटते! संवादप्रधानतेमुळे व घटना-प्रसंग-चित्रणामुळे हे लेखन कधीकधी 'लघुकथा' या आकृतिबंधाकडे झुकते! अनुभवांचे (मीच्या) हे लेखन असले तरी यात वैशिष्ट्यपूर्णता, वेगळेपणा जाणवत नाही! वाचकांना आवडावे या अंगाने सुगम, खेळकर, वरवरचे मांडण्याकडे कल दिसतो. वृत्तपत्रांच्या स्तंभातील लेखनाला असलेली व्यावसायिक मर्यादा (शब्दांची) त्यामुळे आशयमांडणीला बहुधा मर्यादा पडतात!

**प्रिया निघोजकर यांचे ललितबंध**

प्रिया निघोजकर यांच्या १०२ ललितलेखांचा संग्रह 'गोंदणखुणा' म्हणजे 'तरुण भारत'च्या स्तंभलेखनासाठी लिहिलेले लेख आहेत. सोनालींप्रमाणेच गावच्या बालपणीच्या आठवणींचा एक मुख्य धागा यांच्याही ललितबंधात आहे! विशेषतः निसर्ग, गावपरिसर, यांच्याशी असलेले माणसाचे नाते त्या सांगू पाहतात. हेही लघुनिबंध अगदीच स्फुट आकाराचे (पान-दीडपान) असून विशिष्ट आकाराचे देणे दैनिकांच्या सिमित शब्दांच्या तंत्रामुळे आलेले! त्या चौकटीत आपले अनुभवविश्व कसेतरी बसवायचे, कोंबायचे, तुकडे करून करून मांडायचे! त्यामुळे अनुभवांची, चिंतनाची गाढता, गतिमानता, सूत्रमयता यापासून हे लेखन दुरावते. या सर्व ललितलेखांचे वर्गीकरणही लेखिकेने केले आहे. त्याला 'प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा ते', 'सौंदर्यांच्या नव नव लीला', 'मानवतेचे महन्मंगल गाणे' व 'स्वानंदाच्या त्या रानात' अशी शीर्षकेही दिली आहेत. हे अनुभव बरेचदा पुस्तकी, कृत्रिम, अस्वाभाविक, ओढूनताणून बनवलेले असे वाटते! लेखिकेच्या व्यासंगात उत्स्फूर्तता व सहजता हरपते! त्यामुळे त्यास मीत्वप्रधानता कमी व विषयवस्तुनिष्ठा अधिक असे घडते. त्यामुळे लेखनशैली अकारण आलंकारिक व शैलीदार होते. काही लेख रसग्रहणासारखे, काव्यसमीक्षा, साहित्यसमीक्षा या स्वरूपाचे असून त्यांचे लेखन 'ललितलेख' या प्रकारातील आहेत. 'मानवतेचे महन्मंगल गाणे' या भागात विविध व्यक्तींची त्रोटक स्वरूपाची व्यक्तिचित्रे आहेत! ती अपूर्ण, एखाद्या घटना-प्रसंगाशी निगडीत व त्रोटक स्वरूपाची झाली आहेत. इथेही शब्दसंख्या बंधनाने आघात केलेला दिसतो. बरेचसे लेखनविषय सहज-उत्स्फूर्तपणे न येता ठरवून, शोधून, योजून मांडलेले दिसतात. तरलता, भावपूर्णता, उत्स्फूर्तता, सहजता, अभिजातता, जिवंतपणा, चैतन्य, इ. गुणधर्म जे ललितनिबंधात असायला हवेत ते इथे जाणवत नाहीत!

उपरोक्त तीन स्त्री-ललितबंधकारांच्या लेखनात सर्वोत्कृष्ट ललितबंधसंग्रह कोणता ठरेल? या प्रश्नाचे निःसंदिग्ध उत्तर मला अमृता सुभाष यांचा 'एक उलट एक सुलट : भाग २' हा संग्रह वाटतो.




## ग्लोबल वारीच्या निमित्ताने...

# पाऊले चालती पंढरीची वाट

**ज्या वारीला आपल्या मातीचा आणि गुलाल बुक्क्याचा सुगंध येतो. तीच वारी आता थेट सातासमुद्रपार पोहोचली आहे. लंडनच्या रस्त्यावर शेकडो वारकरी भगवे झेंडे, टाळ, चिपळ्या, मृदंग, वीणा घेऊन 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' चा गजर करत विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाले आहेत. या अर्थाने महाराष्ट्राची संस्कृती असलेली पंढरपूरची वारी खऱ्या अर्थाने यंदा ग्लोबल झाली आहे. हा विठ्ठल आता 'विश्वठ्ठल' होऊ लागला आहे. ही भाविक भक्तांची दिंडी लंडन मधल्या विंडसर येथून निघून अकरा देशांचा प्रवास करत भारतात येणार आहे.**

**डॉ. माया पराते– रंभाळे**

९९७०२३७२२१

महाराष्ट्राच्या संस्कृतीतील सर्वात जिवंत लोकाभिमुख आणि अध्यात्मिक परंपरा म्हणजे पंढरीची वारी. शेकडो वर्षांपासून लाखो वारकरी देहू, आळंदी आणि महाराष्ट्रातील कानाकोपर्यातून पायी चालत पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी येतात. यावर्षीची वारी आणखी खास असणार आहे. कारण आता ही वारी फक्त महाराष्ट्र, भारतापुरती मर्यादित राहिली नसून यंदा ती ग्लोबल वारी झाली आहे. भारताबाहेर राहणार्या मराठी माणसांची लंडनहून ही ग्लोबल वारी पंढरपूर च्या दिशेने निघाली आहे. ही बातमी ऐकूणच मराठी माणसाचा ऊर भरुन आला.

आषाढ महिना नव्हे ज्येष्ठ महिना आला की भाविक मनाला पंढरीच्या वारीचे वेध लागतात. पंढरीचा विठोबा हे महाराष्ट्राचे दैवत आणि सांस्कृतिक संचित आहे. 'सुंदर ते ध्यान। उभे विटेवरी। ' ( ज्ञानेश्वर) असा हा पांडुरंग चंद्रभागेतिरी वसला आहे. हा विठ्ठल दिसायला काळाकभिन्न आणि टाचवलेल्या दगडासारखा असला तरी भक्तांना ही विठाई माऊली आपली वाटते. 'रुप पाहता लोचनी। सुख झाले हो साजणी।' असं ज्ञानेश्वर महाराज म्हणतात ते काही उगाच नाही. सगुण– निर्गुण, मूर्त– अमूर्त, निराकार , निरामय अशा विठ्ठलाशी विविध प्रकारची नाती जोडून भक्तांनी त्याला आपल्या ह्दयाच्या बंदीखान्यात कोंडून ठेवले आहे. ही माऊलीच संकटातून आपली सुटका करते असा एक विश्वास, श्रद्धा भक्तांच्या मनात निर्माण झाल्याने प्राचीन काळापासून विठाई माऊलींच्या दर्शनाला लोक जात होते. स्त्रीया देखील 'चल गं सखे, चल गं सखे पंढरीला' असं म्हणत नवी वर्षभराची



ऊर्जा साठवून घेण्यास, आपलं गार्हाणं माऊलीपुढे मांडण्यास पुढे सरसावत होत्या. हीच शेकडो वर्षाची परंपरा आजही जपली जातेय. आषाढ महिना जवळ आला की मन पंढरीच्या पांडुरंगाकडे धाव घेऊ लागते. आपली सर्व कामं बाजूला सारून भक्त आपल्या माऊलीच्या भेटीसाठी सज्ज झाला असतो. इतकेच नाही तर चंद्रभागेतिरी दोन्ही हात कमरेवर ठेऊन ही विठाई माऊलीदेखील आपल्या लेकरांची (भक्तांची) तितकीच तत्परतेने वाट पाहताना दिसते. आपल्या माउलीच्या कुशीत शिरायला आसुसलेली ही लेकरे आपलं दुःख, व्यथा विसरुन, देहभान हरपून आनंद व्यक्त करत नाचत गात माऊलीकडे झेपावतात. 'रामकृष्ण हरी' या मंत्राचा जप करत हा भक्त महिनाभर आधीच तयारीला लागतो. चातक जसा पावसाच्या पाण्याची वाट पाहतो, जलाविन जलचर किंवा पक्षी आणि तिची पिल्लं याप्रमाणेच भक्तांचे चित्त पूर्णतः माऊलीकडे लागलेले असते. डोळ्यात आणि मनात विठ्ठल भेटीची आस निर्माण झाली असते.

पहाटेच्या त्या मंद धुसर प्रकाशात टाळ मृदंगाचा नाद कानावर पडतो आणि मन नकळत त्या वाटेवर निघून जाते. खांद्यावर पताका, गळ्यात तुळशीमाळ, माथ्यावर गोपिचंदनाचा टिळा, गुलाल बुक्क्याचा सुगंध, ओठांवर 'राम कृष्ण हरी' चा गजर , 'निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ,नामदेव, तुकाराम' असा जयघोष आणि त्या तालावर थिरकणारे पाय. धुंद करणारं वातावरण आणि डोळ्यात विठुरायाच्या भेटीची आस.... सर्वच शब्दातीत. ही वाट केवळ पंढरपूर कडे जाणारी नसते ती असते माणसाच्या अंतर्मनात उतरणारी वाट.

वारी म्हटली की लाखो पावलांचा महासागर डोळ्यासमोर उभा राहतो. त्या प्रत्येक पावलामागे एक कथा असते, श्रद्धा असते. एक आशा असते. या वारीत शेतकरी, शिक्षक, मजूर, उद्योगपती, इंजिनिअर, डॉक्टर, तंत्रज्ञानी असे समाजातील सर्व घटकातले लोक सामील असले तरी वारीत सगळ्यांची ओळख एकच....वारकरी!. या वाटेवर चालताना जात, धर्म, पंथ, पद, प्रतिष्ठा यांचे भेद विरघळून जातात आणि उरते ती फक्त माऊलीची लेकर असल्याची जाणीव. 'भेटी लागे जीवा, लागलीसे आस' सर्वांच्या डोळ्यात, हृदयात हाच एक भाव असतो. वारी ही केवळ धार्मिक परंपरा नाही; तर तो समतेचा आणि माणुसकीचा चालता बोलता उत्सव आहे. पंढरीची वाट चालताना प्रत्यक्षात प्रत्येक वारकरी स्वत:चाच शोध घेत असतो.

रिंगणातील उडणारी धूळ, दिंडीतला सामाजिक शिस्तबद्धपणा, अभंगाच्या ओव्यातून झळणारे तत्त्वज्ञान

आणि चंद्रभागेच्या वाळवंटात विठुरायाच्या दर्शनाने ओसंडून वाहणारा आनंद हे सर्व अनुभवण्यासाठी वारीतच जावे लागते. या वारीत विठ्ठल भेटतो की नाही हे माहित नाही; पण या प्रवासात माणूस स्वतःला नक्की भेटतो.

ज्या वारीला आपल्या मातीचा आणि गुलाल बुक्क्याचा सुगंध येतो. तीच वारी आता थेट सातासमुद्रपार पोहोचली आहे. लंडनच्या रस्त्यावर शेकडो वारकरी भगवे झेंडे, टाळ, चिपळ्या, मृदंग, वीणा घेऊन 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' चा गजर करत विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाले आहेत. या अर्थाने महाराष्ट्राची संस्कृती असलेली पंढरपूरची वारी खऱ्या अर्थाने यंदा ग्लोबल झाली आहे. हा विठ्ठल आता 'विश्वठ्ठल' होऊ लागला आहे. ही भाविक भक्तांची दिंडी लंडन मधल्या विंडसर येथून निघून अकरा देशांचा प्रवास करत भारतात येणार आहे. हा प्रवास लंडन, नेदरलँड, बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, पोलंड, झेक रिपब्लिक, हंगेरी, तुर्की आणि जॉर्जिया अशा तब्बल अकरा देशांचा असणार आहे. ०६ जूनला 'जय हरी विठ्ठल'च्या गजरात अतिशय दिमाखात निघालेली ही पहिली ग्लोबल वारी २५ जुलैला पांडुरंग चरणी पंढरपूर ला पोहोचणार आहे. ही माहिती प्रसारमाध्यमांद्वारे आपल्यापर्यंत पोहोचली. यावरून मराठी माणूस जिथेही कुठे असेल तो आपलं दैवत असणार्या विठाई माऊलीला विसरु शकत नाही हेच परत सिद्ध होतंय. जगभर विखुरलेल्या भाविकांच्या हृदयातील स्पंदन बनला आहे. हे सर्व घडतंय ते केवळ पांडुरंगावरील श्रद्धेमुळे. ही दिंडी निघाली तेव्हा तिथले सर्व रस्ते भगवे रुप घेऊन अवतरल्याचे दिसत असल्याचे सांगतात. इतकेच नाही तर पालखी, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन निघालेल्या स्त्रिया ढोल ताशांचा निनाद सोबतच लंडनच्या रस्त्यावर घुमणारा 'जय हरी विठ्ठल' हा केवळ गजर नाही तर भक्तीच्या वैश्विकतेचा तो पुरावा आहे. टाळ, मृदंगाच्या तालावर देहभान विसरुन नाचणारे , नेत्र पैलतिराला लागलेले वारकरी, जयघोष पाहिला, ऐकला की पाहणार्याच्या तोंडून अहाहा! निघाल्याशिवाय राहिले नसेल. काय सुंदर दृश्य असेल नं ते! अवघे वातावरण भक्तिमय झाले असेल. नवा उत्साब, ऊर्जा, श्रद्धा विश्वास,समाधान, शांती या सर्वांचा मिलाफ तेथे दिसत असेल. हे सर्व दृश्य बघून पाहणार्यालाही पंढरपूरला जाणार्यांचा हेवा वाटला असेल. हे सर्व लंडनच्या भूमीवर नव्हे भारताबाहेर पहिल्यांदीच घडतेय. असा हा विश्वविक्रम सोहळा यंदा आकारास येतोय. शेकडो वर्षापासून लाखो लोक स्वयंशिस्त, समता आणि भक्तीचा आदर्श जपत चालत असलेली ही परंपरा जगाच्या सांस्कृतिक वारशाचा भाग व्हावी अशी अपेक्षा वाटते. युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारशांच्या यादीत या वारीला स्थान मिळावे. मिळाल्यास भारतासाठी, महाराष्ट्रासाठी ती निश्चितच अभिमानाची आणि आनंदाची बाब असेल.

संतांनी 'वसुधैव कुटुंबकम्' यातून बंधुभाव, समता, सार्वभौमत्व हा संदेश दिला. आज जग युद्ध, द्वेष, संघर्ष आणि एकाकीपणा यांच्या छायेत असताना हा वारीचा संदेश महत्त्वाचा वाटतो. ग्लोबल वारी ही या संदेशाची आधुनिक आवृत्ती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ग्लोबल वारी म्हणजे आपल्या मुळाशी नातं जोडून ठेवणे. हे सर्व पाहून नामदेवांचे 'नाचू किर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी। ' हे स्वप्न या निमित्ताने मोठ्या रूपात साकारायला लागलेय असे म्हणायला हरकत नाही. हा सर्व सुखसोहळा नक्कीच मनाला तोषविणारा असणार आहे. ही ग्लोबल वारी हे यावर्षीच्या आषाढी वारीचे खास वैशिष्ट्य असणार आहे. आणि ते बघायला आणखी भारतातील भक्तमंडळीची संख्या वाढेल यात शंका नाही. 'अवघी दुमदुमली पंढरी' हे परत एकदा अनुभवास येणार आहे. आपल्यालाही याचे साक्षीदार होता आले तर... असा विचार अनेकांच्या मनात येऊन गेला असेल नं.!!

परदेशात राहणार्या आपल्या मराठी मुलांना आपली संस्कृती, पालखी, दिंडी, अभंग, आणि एकोपा यांचा परिचय करुन द्यायला वारी हे खुप महत्त्वाचे माध्यम आहे. वारी ही केवळ यात्रा नसून सांस्कृतिक संचित, वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आहे. एकंदरीत आपला विठ्ठल केवळ भारतात नाही तर परदेशभूमीवरील घरांत पोहोचला. यामुळे विठ्ठल आणि भक्त दोन्हीही खुष, आनंदी असणार आहे. ही वारी जगभर तर पोहोचली पण या वारीतून मिळणारी समता, सहिष्णुता आणि माणुसकी आपण आपल्या दैनंदिन जीवनात कितपत जपतो याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. कारण ही वाट केवळ विठ्ठल मंदिराकडे जात नाही तर माणसाच्या अंत:करणाकडेही जाते. या वाटेवर अखंड एकच स्वर धुमत राहतो तो म्हणजे.....जय हरी विठ्ठल....




# व्यंकटेश माडगूळकर यांच्या विविधांगी लेखनाचे संदर्भ

**व्यंकटेश माडगूळकरांची खरी ओळख कादंबरीकार आणि कथाकार म्हणून जास्त आहे यात शंका नाही. 'माणदेशी माणसे' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्यातील व्यक्तिचित्रणातून आणि कथानकातून ग्रामीण जीवनाचे जे पैलू त्यांनी वाचकांसमोर ठेवले ते पाहून मराठी वाचक विस्मयचकित झाला. शंकर पाटील आणि बाजीराव पाटील यांच्यासारख्या मोजक्या ग्रामीण लेखकाच्या लेखणीतून ग्रामीण जीवन मराठी वाचकांपर्यंत पोहोचत असले तरी त्याला विनोदी साहित्य म्हणून जास्त पाहिले जात असे. जीवनातील अस्सलता आणि भेदक अनुभव व्यंकटेश माडगूळकरांनी सूक्ष्मपणे टिपले आणि त्याच लहेजामध्ये शब्दांकित केले.**

**किरण शिवहर डोंगरदिवे**

७५८८५६५५७६

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील माडगूळ या गावी ५ एप्रिल १९२७ रोजी झाला. तात्त्विक अर्थाने ५ एप्रिल १९२६ रोजी त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले. कोणत्याही एका क्षेत्रात मोठ्या भावाने जो नावलौकिक मिळवला आहे त्या नावलौकिकाच्या बरोबरीने किंवा किंचित त्यापुढे एक पाऊल असा प्रवास करणारे जे फार मोजके लोक आहेत, त्यामध्ये मला व्यंकटेश माडगूळकरांचे नाव आवर्जून घ्यावेसे वाटते. आधुनिक वाल्मीकी म्हणून ज्यांचा आपण गौरव करतो असे ग. दि. माडगूळकर या मान्यताप्राप्त साहित्यिकाचे धाकटे बंधू असलेले व्यंकटेश माडगूळकर यांनी मराठी साहित्यामध्ये गदिमांच्या सावलीपलीकडे जाऊन स्वतःची ओळख निर्माण केली आणि गदिमांपेक्षा एक पाऊल पुढे म्हणजे साहित्य अकादमी पुरस्कारावर स्वतःची नाममुद्रा उमटविली. खरे म्हणजे कोणताही पुरस्कार हा साहित्याचे परिमापन करणारे परिमाण नव्हे. मात्र साहित्य अकादमीच्या मान्यताप्राप्त यादीमध्ये जाऊन बसण्याचा मान व्यंकटेश माडगूळकरांना मिळाला ते मला महत्त्वाचे वाटते. व्यंकटेश माडगूळकरांनी कथा, कादंबऱ्या, व्यक्तिचित्रण आणि प्रवासवर्णनांसह चित्रपटांसाठी पटकथाही लिहिल्या. व्यंकटेश माडगूळकर यांना शिकारीचा छंद होता. या जंगल सफारीतील अनुभव शब्दांकित केल्यामुळे त्यांची काही पुस्तके जंगलातील शिकारीच्या अनुभवावर असलेली आपल्याला दिसून येते.

लौकिक अर्थाने मॅट्रिकपर्यंतही शिक्षण न झालेल्या या लेखकाने साहित्य क्षेत्रात केलेली निर्मिती आणि स्वप्रयत्नातून



इंग्रजी शिकून पाश्चात्य साहित्याचेही वाचन केले. इतकेच नव्हे तर प्रसंगी त्यातील उत्कृष्ट लिखाणाचे अनुवादही केले.

काही काळ आकाशवाणीमध्ये नोकरी आणि काही काळ पत्रकरिता केल्यानंतर मुंबई या मायानगरीमध्ये स्थिरावल्यावर त्यांचे मराठी चित्रपटसृष्टीत पटकथा लेखनाचे काम सुरू झाले.

त्यांनी लिहिलेली 'पुढचं पाऊल' चित्रपटाची कथा एका दलित कलावंताच्या जीवनावरील ह्या कादंबरीत त्याच्यावरील अन्याय, त्याबद्दलची त्याची चीड आणि पुढचं पाऊल टाकून स्वतःची अस्मिता जपत स्वतःचे मार्ग शोधणारी संघर्षमय धडपड दाखवते. जशास तसे, पुढचं पाऊल, रंगपंचमी, वंशाचा दिवा आणि सांगत्ये ऐका अशा लोकप्रिय चित्रपटांच्या कथा किंवा पटकथा त्यांनी लिहिल्या होत्या. त्यांच्या या चित्रपट कथांमध्ये असलेले विषयवैविध्य पाहिले असता मानवी जीवनाशी आणि तत्कालीन समाज जीवनाशी निगडित असून तत्कालीन समाजरचनेचे प्रतिबिंब यामध्ये उमटलेले दिसून येते. त्यांनी नाटकेही लिहिली, ज्यामध्ये तू वेडा कुंभार, सती, पती गेले गं काठेवाडी ही त्यांतील काही विशेष उल्लेखनीय असून 'कुनाचा कुनाला मेळ न्हाई' आणि 'बिनबियांचे झाड' ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्येही गाजली. कथा आणि कादंबरी प्रांतात नजरेत भरेल इतके यश मिळत असताना तत्कालीन समाज मागणीनुसार लोकनाट्य किंवा नाटक प्रसंगी चित्रपटाच्या पटकथा अशा विविध पातळीवर व्यंकटेश माडगूळकर यांचा वावर राहिला. चित्रपट आणि नाटक यामुळे त्यांचे साहित्य आणि त्यातील विचार व्यापक प्रमाणात महाराष्ट्रभर पोहोचविले गेले.

व्यंकटेश माडगूळकरांची खरी ओळख कादंबरीकार आणि कथाकार म्हणून जास्त आहे यात शंका नाही. 'माणदेशी माणसे' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्यातील व्यक्तिचित्रणातून आणि कथानकातून ग्रामीण जीवनाचे जे पैलू त्यांनी वाचकांसमोर ठेवले ते पाहून मराठी वाचक विस्मयचकित झाला. शंकर पाटील आणि बाजीराव पाटील यांच्यासारख्या मोजक्या ग्रामीण लेखकाच्या लेखणीतून ग्रामीण जीवन मराठी वाचकांपर्यंत पोहोचत असले तरी त्याला विनोदी साहित्य म्हणून जास्त पाहिले जात असे. जीवनातील अस्सलता आणि भेदक अनुभव व्यंकटेश माडगूळकरांनी सूक्ष्मपणे टिपले आणि त्याच लहेजामध्ये शब्दांकित केले. पु. ल. देशपांडे यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली'चे जे गारुड मराठी वाचकांच्या मनावर कोरलेले होते त्याच्या पल्याड जाऊन जीवनातील अस्सलता मराठी साहित्यात रुजवण्याचे काम त्यांनी केले. धर्मा रामोशी, झेल्या, नाम्या मास्तर असे अगदी गावखेड्यात सहज दिसणारी व्यक्तिमत्त्वे माडगूळकरांच्या कथेमध्ये असल्याने ग्रामीण वाचकही साहित्यामध्ये आपल्यासाठी काहीतरी आहे या भावनेतून साहित्याकडे ओढला गेला. यातील 'झेल्या' नावाची कथा गुरु–शिष्य परंपरेत आधुनिक उदाहरण म्हणून देण्यासारखी उत्कृष्ट कथा आहे, असे मला वाटते. त्यानंतर गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस यातील देवा सटवा महार यासारख्या कथा अगदी अंगावर येतात. सीताराम एकनाथ, काळी आई, जांभळीचे दिवस ह्यांसारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. विस्मृतीत गेलेले प्रेम पाहूणपणासाठी गावात परत येणे, किंवा हलाकीच्या परिस्थितीत असलेल्या गुरुजींनी मुलासाठी सायकल विकत घेतल्यावरती ती हरवणे अशा विविध उदाहरणांतील आंबट– गोड कथा म्हणजे जांभळाचे दिवस होय. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथालेखनात ग्रामीण जीवनातील असे विविध अनुभव ज्या स्वाभाविक शैलीत दिले आहेत, तसे उदाहरण फार दुर्मिळ आहे त्यांच्या कथांचे विविध जागतिक भाषांत अनुवादही झाले. 'ओझं' ह्या नावाने त्यांच्या सर्व कथांमधून दलित जीवनावरील कथा एकत्रित करून गो. मा. पवार ह्यांनी जे संपादन केले आहे त्या

ग्रामीण दलित कथा होत, मात्र इतक्या ताकदीच्या दलित कथा देऊनही दलित साहित्यात व्यंकटेश माडगूळकर ओळखले जात नाहीत. व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या कथांमधून संपूर्ण गावगाडा उभा राहतो असे म्हटले जाते, त्यामागे त्यांनी त्यांच्या जीवनात सर्व जातीधर्माच्या आणि बारा बलुतेदार किंवा अठरा अलुतेदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सर्व घटकांशी जे मैत्रीचे आणि जिव्हाळ्याचे नाते जोपासले त्या नात्याची घट्ट वीण कामी आली, असे मला वाटते.

ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रातही माडगूळकरांचे मोलाचे योगदान आहे. 'बनगरवाडी' या कादंबरीतील मास्तर असो, कारभारी असो, की दुष्काळ पडल्यावर गाय-वासरासोबत मरायला थांबलेला एखादा म्हातारा असो, किंवा बैलाच्या बरोबरीने खांद्यावर नांगर घेऊन शेताची नांगरणी करणारी स्त्री असो... ती सर्व पात्रे आपल्याला अस्वस्थ करून सोडतात, तितकीच ती काळजात जास्त रुतून राहतात. वावटळ, पुढचं पाऊल, कोवळे दिवस, करुणाष्टक आणि साहित्य अकादमी प्राप्त असलेली सत्तांतर ह्या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. व्यंकटेश माडगूळकरांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य सरकारचे पुरस्कार लाभले. त्यांत 'गावाकडील गोष्टी', 'काळी आई' ह्यांसारखे कथासंग्रह, 'बनगरवाडी' ही कादंबरी आणि 'सती' ही नाट्यकृती ह्यांचा अंतर्भाव होतो.

'बनगरवाडी'सारख्या मेंढपाळाच्या वस्तीवर लिहिलेल्या कादंबरीच्या तोडीस तोड अशा वावटळ, करुणाष्टक आणि कोवळे दिवस ह्या त्यांच्या कादंबऱ्या आहेत. मात्र त्या आत्मचरित्रपर आहेत. महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर देशभरात ज्या दंगली आणि जाळपोळ ह्यांनी ब्राह्मण समाजावर झालेल्या आघाताची कथा म्हणजे 'वावटळ' ही कादंबरी होय. 'करुणाष्टका'त दारिद्र्याने ग्रासलेली आठ मुलांची दुःखी आई, तिचे दुःख आणि त्या कुटुंबाचा सर्व संघर्ष त्यांनी चितारला आहे. 'कोवळे दिवस' ह्या कादंबरीत अशाच एका कोवळ्या स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव आहेत.

साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेली त्यांची एक कादंबरी म्हणजे सत्तांतर. सत्तांतरमध्ये आरंभापासून अखेरपर्यंत वानरांच्या टोळ्यांचे सूक्ष्म चित्रण आहे. टोळीचे क्षेत्र, परस्परांच्या हद्दीत घुसखोरी, संघर्ष, तेही नरानरांतले, तर कधी माद्यामाद्यांतले, इतर हिंस्त्र प्राण्यांपासून आणि शिकाऱ्यांपासून स्वतःच्या टोळीचा बचाव करण्याची धडपड, टोळीचे नायकत्व आणि टोळीतील माद्या मिळविण्यासाठी वानरांना कराव्या लागणाऱ्या हाणामाऱ्या ह्यांचे विलक्षण परिणामकारक वर्णन ह्या कादंबरीत आहे. सत्तांतर म्हणजे टोळीचा एक राजा जाऊन तेथे दुसरा राजा येणे. हे कसे घडते, हे ह्या कादंबरीचे कथानक होय. मानवी जीवनाला लागू होणारे हे कथानक वानरांच्या कथेतून मानवी जगातील वृत्तिप्रवृत्तींचाही प्रतीकात्मक पातळीवर प्रत्यय येत राहतो. 'काळाप्रमाणे संघर्षही सतत वाहतच असतो' ह्या वाक्यात माडगूळकर सत्तालालसेबाबत महत्त्वाचे अधोरेखन आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांनी ललित लेखनही मोठ्या प्रमाणात केले. त्यांच्या ललित लेखनाला चिंतनाची डूब आणि निरीक्षणाचा साज आणखी शृंगारित करतो असे ते वाचताना आढळते. शिकारीनिमित्त जंगल सफारी करणाऱ्या व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी नागझिरा, पांढरी मेंढरे, हिरवी कुरणे, पांढऱ्यावर काळे, रानमेवा, चित्रे आणि चरित्रे असे विपुल ललित गद्य लिहिले आहे. शब्दावर जितके प्रभुत्व तितकेच प्रभुत्व चित्रकलेवर असल्यामुळे यांच्या कुंचल्यातून निर्माण होणारे चित्र सजीव होऊन बोलणारे आणि त्यांचे शब्दचित्र अत्यंत लाघवीपणे मनाला मोह होणारे होते. 'सिंहाच्या प्रदेशात' या त्यांनी अनुवाद केलेल्या पुस्तकात झेब्रा आणि सिंह या दोन प्राण्यांच्या वाताहतीची, जीवन संघर्षाची कथा आणि व्यथा मूळ लेखकांनी ज्या ताकतीने मांडली आहे तिचा विसर पडून तिच्यावर व्यंकटेश माडगूळकर यांची लेखनमुद्रा ठळकपणे आढळून येते. यावरून अनुवाद करतानाही त्यांनी किती असोशीने आपले कौशल्य त्यात उतरवले ते कळते. चित्रकलेचे कसलेही औपचारिक शिक्षण नसताना त्यांनी चित्रकला साध्य केली, तसेच जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या चित्रशैलीचा अभ्यास केला. पांढरी मेंढरं, हिरवी कुरणं अशा प्रवासवर्णनाची नोंदही त्यांच्या नावावर आहे. 'प्रवास एका लेखकाचा' हे त्यांचे आत्मकथनही प्रभावी आहे. मात्र त्याच्या कथा आणि कादंबरीचा प्रभाव इतका गडद राहिला की, त्यांच्या इतर साहित्याकडे जास्त लक्ष दिले गेले नाही.

१९८३ मध्ये आंबेजोगाई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देऊन त्यांच्या ह्या उत्तुंग अशा साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला.




# ज्ञानरंजक 'पिवळीधमक सगुणाबाई'

**पूर्वी 'मामाचा गाव' हा शहरी मुलांच्या आकर्षणाचा विषय होता. पण आता ते चित्र पूर्णतः बदलले आहे. लोकसंख्यावाढ आणि पाणीटंचाईमुळे खेडी उदास आणि भकास झाली आहेत. 'जागर पर्यावरणाचा' ह्या कथेतील पार्थ आणि आणि आर्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाला, म्हणजे धरणगावला गेले होते. गावाचे नाव जरी धरणगाव असले, तरी तिथे तीव्र पाणीटंचाई होती. त्या पाणीटंचाईने पार्थ आणि आर्याला पाणीबचतीचे महत्त्व शिकवले. पाण्याचा अपव्यय टाळायला शिकवले. ह्या कथेत लेखकाने लोकसंख्यावाढीच्या दुष्परिणामांकडेही वाचकांचे लक्ष वेधले आहे.**

**डॉ. सुरेश सावंत**


एकनाथ आव्हाड हे एक नामवंत बालसाहित्यकार आणि कथाकथनकार आहेत. गेली ३२ वर्षे ते मुंबई महापालिकेच्या सेवेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. कथा, कविता, नाट्यछटा, चरित्र, काव्यकोडी इ. वाङ्मयप्रकारांतील त्यांची ४० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या एकूण साहित्यसेवेवर समीक्षणात्मक ५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. आव्हाड यांच्या 'पिवळीधमक सगुणाबाई' ह्या बालकथासंग्रहात तेरा कथा आहेत.

विरंगुळा म्हणून, गंमत म्हणून बालसाहित्य लिहिणे वेगळे आणि निष्ठापूर्वक, जिवीच्या जिव्हाळ्याने, सातत्याने गुणवत्तापूर्ण बालसाहित्य लिहिणे वेगळे. एकनाथ आव्हाड हे सानेगुरुजींच्या बालनिष्ठेने बालसाहित्य निर्मिती करतात. त्यांच्या रक्तात बालसाहित्य आहे आणि त्यांच्या श्वासातही बालसाहित्य आहे. त्यांच्या लेखनात मनोरंजन, ज्ञान आणि संस्कार ही तिन्ही मूल्ये अगदी हातात हात घालून येतात. यांच्या लेखनात सहजता, सुलभता आणि साधेपणा असतो. त्यांची प्रत्येक कलाकृती ही बालमनाची पकड घेते. त्यांच्या काही पुस्तकांचे हिंदी आणि इंग्रजीत भाषांतर झाले आहे. काही पुस्तके ब्रेल लिपीत आली आहेत. त्यांच्या साहित्याचा शालेय आणि विद्यापीठीय पाठ्यपुस्तकांत समावेश करण्यात आला आहे. त्यांच्या 'छंद देई आनंद' ह्या बालकवितासंग्रहाला २०२३ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

एकनाथ आव्हाड यांनी आजवर बालसाहित्याचे फार मोठे अवकाश आपल्या कवेत घेतले आहे, तरी अजूनही त्यांची बालसाहित्य निर्मितीची घोडदौड अखंडपणे चालू

आहे. लेखन विपुल असले, तरी त्यात कुठेही तोचतोचपणा येत नाही. नावीन्य आणि प्रयोगशीलता हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत. 'पिवळीधमक सगुणाबाई' हा त्यांचा आठवा बालकथासंग्रह म्हणजे ह्या वाटचालीतला महत्त्वाचा टप्पा, कळसाध्याय आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

'पिवळीधमक सगुणाबाई' ह्या कथेतली मेधा ही मोठी जिज्ञासू मुलगी आहे. तिच्या शाळेतल्या कामतबाईंनी औषधी वनस्पतींची लागवड करण्याची स्पर्धा ठेवली आहे. हळद ह्या औषधी वनस्पतीवर ती आपला प्रकल्प तयार करते. मेधामुळे आपल्याला हळदीचे अनेक औषधी गुणधर्म सहजगत्या समजतात. ही कथा मनोरंजनाबरोबरच बालवाचकांच्या ज्ञानातही भर घालते.




**'पिवळीधमक सगुणाबाई' (बालकथासंग्रह)**
**लेखक : एकनाथ आव्हाड**
**प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**
**पृष्ठे : ९६ , किंमत : रु. २९५/–**

आपल्याला चहात आणि भाजीत आले ठेचून घालतात एवढंच माहिती आहे. पण आल्याचे आणखीही कितीतरी औषधी उपयोग आहेत हे ह्या गोष्टीतून आपसूक कळते. आई–वडील आणि सुशांत ह्या तिघांच्या संवादातून ही कथा फुलत जाते. आईवडलांनी आणि शिक्षकांनीही ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की जिज्ञासेतूनच ज्ञानाचा जन्म होत असतो. म्हणून लहान मुलांना प्रश्न विचारायला प्रवृत्त केले पाहिजे. या दृष्टीने ही कथा येथे मला महत्त्वाची वाटते.

'नंतरला असतं अंतर' ह्या कथेचा नायक चिन्मय आहे. प्रत्येक कामाचा त्याला भारी कंटाळा. कोणतेही काम सांगितले, की 'नंतर करतो' हे त्याचे उत्तर ठरलेले! या त्याच्या सवयीमुळे आई आणि आजी त्याला सारख्या टोकत असतात. त्याच्या अशा आळसामुळे, पाणी न दिल्याने कुंडीतील रोपं मलूल होतात. घरातील ओल्या कचरा वेळीच बाहेर नेऊन न टाकल्यामुळे त्याचा वास सुटतो. आपल्यातही असा एक आळशी चिन्मय दडून बसलेला असू शकतो. आळशी चिन्मयला समजावून सांगताना आजी एक तालकथा सांगते. कथेच्या शेवटच्या कडव्यात जीवनोपयोगी संदेश देताना म्हणते :

'म्हणून कोणत्याही गोष्टीचा
वेळीच विचार करावा
वेळच्या वेळी कामाचा
सतत आग्रह धरावा'

हा संदेश एकट्या चिन्मयसाठी नाही, तर सगळ्यांसाठी आहे, असे वाटते.

हल्ली जगभर पाणीटंचाई जाणवते आहे. आपण दररोज वेगवेगळ्या कामांसाठी पाण्याचा भरपूर वापर करतो. आपण अनेकदा पाणी वाया घालवतो. माधवच्या घरचा नळ माधवला पाण्याच्या वापराबाबत अनेक गोष्टी सांगून त्याचे डोळे उघडतो. वेलीवर फूल उमलून यावे, इतक्या सहजतेने एकनाथ आव्हाड यांच्या प्रत्येक कथेत छान छान कविता फुलून आलेली असते. 'थेंबे थेंबे तळे साचे' ह्या कथेतही एक सुंदर कविता आहे.

'पाण्यामुळेच सुखावतो, ओसाड उजाड माळ
पाण्यामुळेच सुरक्षित, आपला भविष्यकाळ'

ह्या ओळी पाण्याचे महत्त्व पटवून देतात. कथेतून सहजपणे उमलून आलेल्या कवितेच्या ओळी मूळ कथाशयाला पुष्टी देतात. माधवच्या माध्यमातून लेखकाने 'पाणी वाचवा जीवन वाचवा' आणि 'प प पाण्याचा, पाणी जपून वापरण्याचा' असा अनमोल संदेश दिला आहे.

'हे तर आलं' ह्या कथेचा नायक, पाचवीत शिकणारा सुशांत हा एक चिकित्सक मुलगा आहे. उत्सुकता, उत्कंठा आणि कुतूहल हे गुण त्याच्या अंगी ठासून भरलेले आहेत. तो घरी आईवडिलांना आणि शाळेत शिक्षकांना प्रश्न विचारून भंडावून सोडत असतो. वेगवेगळ्या विषयांवर तो आई–वडिलांशी छान संवाद साधत असतो. एकदा आलं या विषयावर तो आईवडलांकडून भरपूर माहिती मिळवतो.

शैक्षणिक सहल म्हटली की खूपच मौजमजा! सहल प्रत्येकालाच आवडते. 'ऐकू या जरा' ह्या कथेतील बाळूला महाबळेश्वरच्या सहलीला जायचे आहे. त्यासाठी बाबांनी परवानगी तर दिलीच, शिवाय सहलीविषयी जी गोष्ट सांगितली, ती अधिक महत्त्वाची आहे. 'सहल म्हणजे अभ्यास आणि आनंद यांचा सुरेख मेळ. सहल म्हणजे निसर्गाची नवलाई जवळून पाहण्याची, अनुभवण्याची मिळालेली एक संधीच. त्या संधीचं आपण सोनं केलं पाहिजे.'

ते पुढे म्हणाले, की माणूस हा जन्मभर विद्यार्थीच असतो. हा मंत्र लक्षात ठेवून बाळू महाबळेश्वरच्या सहलीला जाऊन आला. येताना त्याने सहलीवर एक छान कविता लिहिली आहे. ती मुळातून वाचण्यासारखी आहे. या सहलीतून बाळूला काय मिळाले, याचे उत्तर ह्या कवितेत सापडते. गोष्ट वाचता वाचता नकळत आपणही बाळूसोबत महाबळेश्वरच्या सहलीचा आनंद घेऊन येतो.

पाचवीत शिकत असलेला राघव हा भलताच भारी कलाकार आहे. तो स्वतःच नाट्यछटा लिहून शाळेतील कार्यक्रमात सादर करतो. एके दिवशी त्याला नाट्यछटेचा विषयच सुचत नाही, आणि वरून आई त्याला काम सांगते. त्या धांदलीत मिठाची बरणी त्याच्या हातून निसटते आणि फुटते. खाली सांडलेलं मीठ चक्क राघवशी बोलू लागतं. आपले औषधी गुणधर्म त्याला सांगतं. मिठाचे सेवन कमी किंवा जास्त झाले, तर काय दुष्परिणाम होतात, याची जाणीव करून देतं. त्यावरून राघवला नाट्यछटेचा विषय मिळाला, 'जरा ऐकून तर घ्या – मी मीठ बोलतोय.' ही कथा आपल्याला मिठाविषयी जागरुक करते आणि आपल्या ज्ञानात भरही घालते.

शेजारच्या माधवकाकांनी कोकणातील हापूस आंब्यांची पेटी आणून दिली आहे. त्यांचा सुगंध घरभर दरवळतो आहे. सोहम आणि सोनाली हे भाऊ–बहीण आमरस पुरीचे जेवण करण्यासाठी अगदी उतावीळ झाले आहेत. इतक्यात माधवकाका आले आणि त्यांनी आंबे पिकवण्याच्या दोन पद्धतींची माहिती दिली. 'रायप्निंग चेंबर' ही नैसर्गिक पद्धतीने आंबे पिकवण्याची पद्धत आहे. ही खूप चांगली आहे. काही लोक भरपूर नफा कमावण्यासाठी कृत्रिम पद्धतीने आंबे पिकवतात. त्यासाठी कॅल्शियम कार्बाईड पावडरचा वापर करतात. ही पद्धत आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. याची माहिती 'झाडावर पिकलाय आंबा' ह्या कथेत वाचायला मिळते. ही कथा वाचल्यानंतर नैसर्गिकरीत्या पिकलेला आंबा कसा ओळखावा हे सहज मुलांच्याही लक्षात येईल.

उन्हाळ्याच्या सुट्टीत गीता आणि गीतेश मामाच्या गावी गेले होते. 'खा, प्या, खेळा, वाचा आणि नाचा' अशी त्यांची मौजमस्ती चालली होती. गीतेशला नदीत पोहायची खूप इच्छा होती, पण गावाला संतोष आणि आनंद देणारी संतोषी नदी आटली होती. पाण्याशिवाय ती नदी बापुडवाणी दिसत होती. लोकांनी नदीपात्रात प्लास्टिकचा कचरा टाकला होता. कारखान्याचं सांडपाणी नदीत सोडलं होतं. निर्माल्य नदीत टाकले होते. गणपतीच्या मूर्तींचे विसर्जन नदीतच केले होते. लोकांनी नदीपात्र घाण करून टाकले होते. एके दिवशी ही नदी गीतेशच्या स्वप्नात येऊन आपली खंत बोलून दाखवते. गीतेश नदीला साफसफाईचे वचन देतो. सगळे जण गीतेशचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी झटतात. 'सरिता करते का कधी खंत' ह्या कथेच्या माध्यमातून लेखकाने नदी प्रदूषणाच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले आहे आणि त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज पटवून दिली आहे.

पूर्वी 'मामाचा गाव' हा शहरी मुलांच्या आकर्षणाचा विषय होता. पण आता ते चित्र पूर्णतः बदलले आहे. लोकसंख्यावाढ आणि पाणीटंचाईमुळे खेडी उदास आणि भकास झाली आहेत. 'जागर पर्यावरणाचा' ह्या कथेतील पार्थ आणि आणि आर्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाला, म्हणजे धरणगावला गेले होते. गावाचे नाव जरी धरणगाव असले, तरी तिथे तीव्र पाणीटंचाई होती. त्या पाणीटंचाईने पार्थ आणि आर्याला पाणीबचतीचे महत्त्व शिकवले. पाण्याचा अपव्यय टाळायला शिकवले. ह्या कथेत लेखकाने लोकसंख्यावाढीच्या दुष्परिणामांकडेही वाचकांचे लक्ष वेधले आहे.

२२ एप्रिल हा दिवस 'वसुंधरा दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. 'वसुंधरा दिन' ह्या कथेत लेखकाने चीनमध्ये घडलेली एक खरीखुरी गोष्ट सांगितली आहे. निसर्गाचा समतोल राखायचा, तर झाडे, प्राणी, पक्षी सगळेच महत्त्वाचे, हा विचार अधोरेखित केला आहे.

'परोपकारी लसूण' ह्या कथेतला लसूण खरोखरच परोपकारी आहे. तो माणसासारखाच चालतो आणि बोलतोसुद्धा! तो प्रत्येक गरजू माणसाला आपल्या पाकळ्या देत राहतो. लोकांना दु:खमुक्त करत राहतो. आपण इतरांना

**सरसरता साहित्य पत्रिकेसाठी लिहिते व्हा...**

आपल्या कथा, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन इ. साहित्य समरसता साहित्य पत्रिकेत प्रकाशित करू शकता. आपले साहित्य संपादक समरसता साहित्य पत्रिका १/६ जैन इस्टेट, विलेज रोड, भांडूप (प.), मुंबई – ७८ या पत्त्यावर पाठवावे.

देत देत संपत आलो, याचे त्याला अजिबात वाईट वाटत नाही. उलट आपण इतरांच्या उपयोगी पडलो, याचा त्याला आनंदच झाला.

ही अद्भुतरम्य गोष्ट बाळगोपाळांना नक्कीच आवडेल. 'चला, झाड होऊया' ह्या कथेची भाषा अतिशय लयबद्ध, तालबद्ध आणि नादमधुर अशी आहे. ह्या कथेतील सुधाचे वृक्षप्रेम आपल्या सगळ्यांच्या अंगी यायला हवे.

'अशी घडली जादू' ह्या कथेतील राजीव हा मुलगा घरी आल्यावर विज्ञानावर आधारित जादूचे प्रयोग करून दाखवतो. ते पाहून त्याची आई म्हणते, 'शाळेत मिळविलेल्या ज्ञानाचा, विज्ञानाचा रोजच्या जीवनात उपयोग करणं हेच खरं शिक्षण. यालाच म्हणतात, ज्ञानाचं उपयोजन.'

पुस्तकी ज्ञानाचं उपयोजन करायला शिकवणाऱ्या ह्या गोष्टी आनंददायक आणि ज्ञानवर्धक आहेत.


पाण्याचा नळ माधवला बोलतो, फुटलेल्या बरणीतलं मीठ राघवला बोलतं, गीतेशला नदी बोलते, अशी सगळी उत्कंठावर्धक अद्भुतरम्यता ह्या कथांमध्ये आहे.

एकनाथ आव्हाड यांच्या कथेत, कथा आणि कवितेचे फारच छान अद्वैत दिसून येते. आव्हाडांची प्रत्येक कथा ही हसत-खेळत काही एक विचार देऊन समृद्ध करणारी कथा आहे.

ह्या कथेत 'ज्याचा हात मोडेल, तो त्याच्याच गळ्यात पडेल', 'चोराच्या उलट्या बोंबा', 'उतावळा नवरा, गुडघ्याला बाशिंग', 'प्रयत्नांती परमेश्वर', 'अति खाणं आणि मसणात जाणं', ह्यांसारख्या चपखल म्हणी येतात. ह्या म्हणी कथेच्या आशयाला आणखी उठाव देतात.

'उन्हाचा ताप, बापरे बाप!' असे हे ओघवते लेखन वाचकाच्या मनाचा ठाव घेते. एकूणच ह्या पुस्तकातील सर्वच कथा मुलांचे मनोरंजन करता करता निसर्ग, पर्यावरणाबाबत मुलांमध्ये जाणीव जागृती विकसित करणाऱ्या आणि वैज्ञानिक दृष्टी व्यापक करणाऱ्या आहेत. म्हणूनच या कथांचे मोल मला अनमोल वाटते.

ह्या पुस्तकाला लाभलेली चंद्रमोहन कुलकर्णी यांची नितांत सुंदर चित्रे आणि नेत्रदीपक सजावट म्हणजे सोन्याला लाभलेला सुगंधच जणू! डॉ. बाळ फोंडके यांनी ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून पाठराखण केली आहे. उत्कृष्ट कागदावर रंगीत छपाई करून मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी ह्या पुस्तकाची निर्मिती अतिशय अप्रतिम केली आहे! ह्या पुस्तकाच्या सहवासात बच्चे कंपनीची उन्हाळी सुट्टी आनंददायी होईल, यात काही शंकाच नाही! लेखक आणि प्रकाशक, ह्या दोघांचेही हार्दिक अभिनंदन!






# हमरस्ता

**आपण जीवनामध्ये कोणताही निर्णय शंभर टक्के स्वत:च्या मनाने घेण्याची गरज आहे. पण त्याआधी इथे सर्व शक्यता-अशक्यतेचा विचार करण्याची गरज आहेच. आपल्या ओळखीपाळखीचे किंवा नातेवाईक यांना आलेला अनुभव विचारात घेणे गरजेचे आहे. मी म्हणत नाही की, रुळलेल्या वाटेवरून चालू नये, पण रुळलेल्या वाटेवरून चालताना स्वत:चीही छोटीशी का होईना, पायवाट अधूनमधून घेऊन बघायला काय हरकत आहे? तिचा आपल्याला फारसा उपयोग नाही झाला तर सोडूनही देता येते, पण न जाणो आपण निर्माण केलेली ही छोटीशी पायवाट कधी अनेकांसाठी हमरस्ता होऊन जाऊ शकते!**

**प्रतिभा सराफ**

९८९२५३२७९५

'टर्की'मधल्या एका गावात चारशे पन्नास मेंढरांनी एका उंच कड्यावरून उडी मारून आत्महत्या केली, असे वृत्त प्रसिद्ध झाले. मग मेंढरं आत्महत्या करू शकतात का? यावर चर्चा घडल्या आणि जे वृत्त समोर आले त्यानुसार असे लक्षात आले की, मेंढरं कळपाने राहतात. त्या कळपातले जे सर्वात पुढचं मेंढरू असेल त्या मेंढराला सगळे 'फॉलो' करतात. म्हणजे त्याच्या मागे मागे जातात. आता पहिलं मेंढरू डोंगरावरून पडल्यामुळे इतरांनी आंधळेपणाने त्याच्या मागे जाणे पसंत केले आणि ते सर्व पडून मेले. 'या मेंढ्याने उडी मारली की ते चुकून पडले' यावर विचार होऊन असे लक्षात आले की, ते धक्क्याने चुकून पडले. आता या कळपात फक्त चारशे पन्नास मेंढरं नव्हती तर दीड हजार मेढरं होती. ती या मेंढरांवर पडल्यामुळे वाचली.. इतकेच!

हे फॉरवर्डेड व्हिडीओच्या भाषणातून ऐकले. माझ्या लक्षात आले की, आपलेसुद्धा हेच होत चालले आहे. आपण सोशल मीडियावर पाहतो की एखाद्या गाण्यावरचा व्हिडीओ जेव्हा प्रसिद्ध होतो, तेव्हा इतरही त्याच गाण्यावर किंवा त्याच स्वरूपाचे व्हिडीओ बनवू लागतात. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे म्हणजे 'माझ्या पप्पांनी गणपती आणला...' या गाण्यावरचा व्हिडीओ खूप गाजला. अनेकांनी त्याचे अनुकरण करत, कधी विडंबन करत हजारो व्हिडीओ तयार केले. गंमत म्हणजे तेही व्हिडीओ गाजले. पण प्रत्येक वेळेस असे होईलच असे नाही.

कोणीतरी केलेला ढोकळा पाहून मीही केला, तर माझ्याकडे पाहुणा म्हणून आलेला मित्र थट्टेने म्हणाला की, अरे हा तर 'च्युईंगम ढोकळा' आहे. त्याने त्याचे यथायोग्यच नाव दिले होते.

हे वाचून आपल्याला असे अनेक फसलेले पदार्थ, फसलेले प्रसंग आणि मुख्य म्हणजे फसलेले नातेसंबंध नक्कीच आठवतील!



कितीतरी वेळा कधी विचार न करता केलेले किंवा खूप खोल विचाराने केलेलेसुद्धा अनुकरण तोंडघशी पडते. पैसा आणि वेळ वाया जातो. मानसिक त्रास होतो तो वेगळाच!

शाळेतलेच उदाहरण द्यायचे म्हणजे ९० टक्के विद्यार्थी सहज दिसतो म्हणून समोर बसलेल्या विद्यार्थ्याच्या पेपरमध्ये वाकून बघत असतो. 'कॉपी करणे' हा त्याचा खूपदा उद्देशही नसतो, परंतु अंडरलाईन केलेल्या अशा गाळलेल्या जागी त्या विद्यार्थ्याने लिहिलेले शब्द सहज दिसतात, तेव्हा आपण जे लिहिलंय ते चुकीचे वाटू लागते. त्याने जे लिहिले ते बरोबर वाटू लागते आणि मग आपण जो शब्द लिहिला आहे तो खोडून त्या जागी त्याने लिहिलेला शब्द लिहितो. आता परत हेच म्हणायचे आहे की, प्रत्येक वेळेस तो शब्द बरोबरच असतो असे नाही. कधी कधी आपण लिहिलेला शब्दही बरोबर असायची शक्यता असते.

शक्यता-अशक्यता यावर खूप लिहिता येईल. पण एक गोष्ट निश्चितपणे मला इथे मांडायला आवडेल की, बहुतेक लोक (मीसुद्धा) स्वतःबद्दल कोणताही निर्णय घ्यायला घाबरतात. चार लोकांबरोबर त्या गोष्टीबद्दल बोलतात. कधी कधी या चार लोकांची चार वेगवेगळी मतेही असू शकतात आणि मग आपण संभ्रमित होतो. या संभ्रमित अवस्थेत आपण कोणता तरी निर्णय घेतो, जो बरोबर असतो किंवा चुकीचा ठरू शकतो.

आपण जीवनामध्ये कोणताही निर्णय शंभर टक्के स्वत:च्या मनाने घेण्याची गरज आहे. पण त्याआधी इथे सर्व शक्यता-अशक्यतेचा विचार करण्याची गरज आहेच. आपल्या ओळखीपाळखीचे किंवा नातेवाईक यांना आलेला अनुभव विचारात घेणे गरजेचे आहे. मी म्हणत नाही की, रुळलेल्या वाटेवरून चालू नये, पण रुळलेल्या वाटेवरून चालताना स्वतःचीही छोटीशी का होईना, पायवाट अधूनमधून घेऊन बघायला काय हरकत आहे? तिचा आपल्याला फारसा उपयोग नाही झाला तर सोडूनही देता येते, पण न जाणो आपण निर्माण केलेली ही छोटीशी पायवाट कधी अनेकांसाठी हमरस्ता होऊन जाऊ शकते!




# समर्पण जगण्याचा आलेख

**पाचशे पानात सामावलेल्या या आत्मकथनाला स्वामी विष्णुपादानंद यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ते लिहितात, देश विदेशातील रामकृष्ण संघाच्या सर्व आश्रमांना भेट देणे आणि तेथील आश्रमवासीयांशी जवळीक साधणे, म्हणून परमभाग्याची गोष्ट आहे. ही भावना मनात बाळगणे आणि ती कृतीत उतरविणारे श्री सोनारांसारखे आणखी कोणी पूर्वी होते किंवा सध्या आहेत याची मला तरी कल्पना नाही. इतके वेगळेपण सोनारांनी केलेल्या या आगळ्या तीर्थयात्रेचे आहे आणि तेवढेच विलक्षणत्व आहे.**


**प्रतिनिधी**

मराठी साहित्य विश्वात आत्मकथन हा प्रसिद्ध आणि वाचकप्रिय लेखन प्रकार आहे. मी, माझेपासून आम्हीपर्यंतचा प्रवास या लेखनात अनुभवता येतो. मराठी साहित्यात अनेक अजरामर आत्मकथने प्रसिद्ध झाली आहेत. आधुनिक काळात 'कऱ्हेचे पाणी', 'कृष्णाकाठ'पासून ते 'मी असा घडलो'पर्यंतची ही आत्मकथन मालिका आहे. या मालिकेत सुधाकर सोनार यांचे 'समर्पण (उत्तरार्ध)' या आत्मकथनाचा समावेश करता येईल. याआधी त्यांचे कोविड आपत्तीच्या काळात 'समर्पण (पूर्वार्ध)' प्रकाशित झाले. जन्मापासून म्हणजे १९४४ पासून १९८६ या कालखंडाचा आढावा सोनार यांनी घेतला आहे. तर समर्पण (उत्तरार्धात) मध्ये १९८७ ते २०२४ पर्यंतचा आढावा घेतला आहे. वाणिज्य शाखेतील शिक्षण घेतलेल्या आणि त्या क्षेत्रात लक्षणीय कार्य करणाऱ्या सुधाकर सोनार यांनी आपल्या जीवनातील आध्यात्मिक उन्नती आणि आत्मसुख अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व वाटचालीचा आढावा सुधाकर सोनार यांनी या आत्मकथनात घेतला आहे. ते आपल्या मनोगतात लिहितात, भौतिक सुखामागे धावणाऱ्या माझ्या जीवनात पुन्हा एक वळण आले. एका शुभमुहूर्तावर मी आध्यात्मिक विश्वात ओढलो गेलो. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'विवेकानंद भारत परिक्रमा' कार्यक्रमात मी सक्रिय सहभाग घेतला. काही संन्यासी मंडळींच्या मी संपर्कात आलो व मला आध्यात्मिक क्षेत्राची गोडी वाटू लागली. भगवान रामकृष्ण परमहंस व माता शारदा यांनी मला आपला बालक म्हणून जवळ घेतले. मी रामकृष्ण मिशनची दीक्षा घेतली. मला बेलुर मठात जाण्याची गोडी वाटू लागली. वारकरी जसे दिंडी घेऊन जातात, तसा माझ्या सोबत अनेक भक्तांना घेऊन बेलुरला जाऊ लागलो.

माझ्या भाग्याचा विस्तार एवढ्यावरच थांबला नाही.

तीर्थक्षेत्रांना भेटी द्याव्यात तसा मी भारतातील रामकृष्ण मिशनच्या आश्रमांना भेटी देत फिरू लागलो. दहा वर्षांच्या आत मी भारतातील सर्व आश्रमांना भेटी दिल्या व त्या आश्रमांतील स्वामीजींचे आशीर्वाद घेतले. यामुळे माझी अध्यात्माची भूक अजून वाढली व आता जगातील सर्व आश्रमांना भेटी द्याव्यात असा संकल्प केला. गुरुदेवांच्या कृपेने माझा हा संकल्पसुद्धा पूर्ण झाला. आजमितीला जगात स्थापित असलेल्या सर्व आश्रमांना भेटी देणारा मी एकमेव भक्त ठरलो. माझ्या जीवनाचा आलेख जेव्हा मांडतो, तेव्हा विपरीत परिस्थितीतून आध्यात्मिक क्षेत्रात एक जगावेगळे शिखर गाठणारे माझे यश मला अवर्णनीय आनंद देत असते.

सव्वाशे–दीडशे वर्षांपूर्वी भारताची आध्यात्मिक शक्ती जागृत करून दिशादर्शक ठरणारे विवेकानंद आजही अनेकांना प्रेरणादायी असतात. सुधाकर सोनार स्वामी विवेकानंद यांना प्रेरणास्थान मानून आपल्या जीवनमार्गांची वाटचाल करतात. या जीवन प्रवास आलेले अनुभव त्यांनी रसाळ शैलीत ‘समर्पण’मध्ये शब्दबद्ध केले आहेत. देशाच्या विविध प्रांतांत पसरलेले रामकृष्ण मठाचे काम त्यांनी मांडले आहे. गृहस्थी जीवन जगताना त्यांनी साधक म्हणून केलेली वाटचाल दिसून येते.




**समर्पण**
लेखक– सुधाकर सोनार
प्रकाशक – सौ. कविता सुधाकर सोनार
मूल्य – रु. ५००/–, पृष्ठे – ५०४

पाचशे पानात सामावलेल्या या आत्मकथनाला स्वामी विष्णुपादानंद यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ते लिहितात, देश विदेशातील रामकृष्ण संघाच्या सर्व आश्रमांना भेट देणे आणि तेथील आश्रमवासीयांशी जवळीक साधणे, म्हणून परमभाग्याची गोष्ट आहे. ही भावना मनात बाळगणे आणि ती कृतीत उतरविणारे श्री सोनारांसारखे आणखी कोणी पूर्वी होते किंवा सध्या आहेत याची मला तरी कल्पना नाही. इतके वेगळेपण सोनारांनी केलेल्या या आगळ्या तीर्थयात्रेचे आहे आणि तेवढेच विलक्षणत्व आहे. त्या सर्व तीर्थयात्रांचे त्यांनी केलेले सांगोपान वर्णन ते इतके ओघवते आहे आणि त्या भावनेने ओथंबलेले आहे की आपण जणू काही प्रत्यक्ष तिथे आहोत आणि त्या भावनेचा स्पर्श आपण अनुभवतो आहोत, असे या ग्रंथाचे वाचन करताना जाणवते

‘समर्पण’ हे आत्मकथन साधकांसाठी उपयुक्त आहे, त्याचप्रमाणे गृहस्थी जीवन जगणाऱ्यांनाही उपयुक्त आहे. भक्ती, ज्ञान, साधना याचा त्रिवेणी संगम या आत्मकथनात अनुभवता येतो.






# ग्रामीण विनोदाचा खळखळता झरा : ‘गावची जत्रा भानगडी सतरा’

**या कथासंग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याची ओघवती भाषाशैली, सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि सहजसुंदर विनोदनिर्मिती. कुठेही विनोदासाठी कृत्रिम प्रसंग निर्माण केलेले नाहीत. त्यामुळे कथांमधील हास्य हे जीवनातून आलेले आणि मनाला स्पर्श करणारे वाटते. ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण करताना लेखकाने मानवी स्वभावातील गमतीदार पैलू अत्यंत प्रभावीपणे उलगडले आहेत.**

**प्रवीण ज. बोपुलकर**

चपराक प्रकाशनद्वारा प्रकाशित डॉ. राजेंद्र माने लिखित 'गावची जत्रा भानगडी सतरा' हा विनोदी कथासंग्रह नुकताच वाचनात आला. खरं तर लेखकांनी वाचकांना या कथासंग्रहाच्या रूपात सात रसायनांचे हास्य टॉनिक उपलब्ध करून दिले आहे. दैनंदिन आयुष्य जगताना अगदी छोट्या-छोट्या प्रसंगातून निर्माण होणारे विनोद लेखकांनी अगदी अचूक टिपले आहेत. खरं तर या सात कथा माने सरांच्या असल्या तरी जनसामान्यांना या कथांमधील अनुभव दररोज येत असतात आणि म्हणूनच या कथा सर्वसमावेशक वाटतात.


खरं तर सध्यस्थितीत मराठी साहित्यात विनोदी कथा हा प्रकार दिवसेंदिवस दुर्मिळ होत चालला असताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र माने यांचा ‘गावची जत्रा भानगडी सतरा’ हा कथासंग्रह वाचकांना निखळ आनंदाची पर्वणी देणारा ठरतो.

एकूण सात कथांनी सजलेल्या या संग्रहातील प्रत्येक कथा ग्रामीण जीवनातील सहज, नैसर्गिक आणि प्रसंगजन्य विनोदाचे दर्शन घडवते. गावगाड्यातील भाबडी माणसे, त्यांचे निरागस वर्तन, त्यांच्या बोलण्यातून आणि दैनंदिन व्यवहारातून निर्माण होणारा विनोद लेखकाने अत्यंत संवेदनशीलतेने टिपला आहे. त्यामुळे कथा कृत्रिम किंवा ओढूनताणून वाटत नाहीत; उलट त्या वाचकांच्या मनात थेट पोहोचतात.

विनोदी साहित्यनिर्मिती हे अत्यंत अवघड काम मानले जाते. त्यासाठी लेखकाला ग्रामीण समाजाशी एकरूप व्हावे लागते, माणसांच्या स्वभाववैशिष्ट्यांचा अभ्यास करावा लागतो

आणि त्यांच्या जीवनातील गमती–जमती प्रतिभेच्या कसोटीवर घडवून सादर कराव्या लागतात. डॉ. माने यांनी हे आव्हान यशस्वीपणे पेलले आहे. सातारा परिसरातील ग्रामीण जीवनाचा जवळून घेतलेला अनुभव त्यांच्या लेखनाला वास्तवतेची जोड देतो.

कथासंग्रहातील ‘प्रौढ शिक्षण’, ‘गावची जत्रा भानगडी सतरा’, ‘पाटलाची मीटिंग’, ‘डाव जिंकला’ आणि ‘दारूबंदी’ यांसारख्या कथा वाचकांना खळखळून हसवतात. गावातील जत्रा, कुस्त्यांचे फड, तमाशांचे वातावरण, प्रौढ शिक्षणाचे वर्ग आणि त्या अनुषंगाने घडणारे प्रसंग लेखकाने इतक्या जिवंतपणे उभे केले आहेत की वाचक स्वतः त्या घटनांचा साक्षीदार असल्याचा भास होतो. अगदी छोट्या छोट्या प्रसंगातून विनोदी कथांचे कथाबीज कसे शोधावे हे खरे तर या संग्रहाचे लेखकांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. या बाबीचे श्रेय आदरणीय माने सरांच्या स्वभावाला जाते, कारण ते नेहमी हसमुख असतात.




या कथासंग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याची ओघवती भाषाशैली, सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि सहजसुंदर विनोदनिर्मिती. कुठेही विनोदासाठी कृत्रिम प्रसंग निर्माण केलेले नाहीत. त्यामुळे कथांमधील हास्य हे जीवनातून आलेले आणि मनाला स्पर्श करणारे वाटते. ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण करताना लेखकाने मानवी स्वभावातील गमतीदार पैलू अत्यंत प्रभावीपणे उलगडले आहेत.

आपल्या सहज विनोदशैलीने सातही कथा अगदी सुंदर झाल्या आहेत. त्यामुळे ‘गावची जत्रा भानगडी सतरा’ हा कथासंग्रह वाचकप्रिय ठरेल आणि मराठी विनोदी साहित्यविश्वात आपले वेगळे स्थान निर्माण करेल, असा विश्वास वाटतो. आपणा सर्वांच्या संग्रही असावा हा कथासंग्रह सर्वांनी विकत घेऊन नक्की वाचावा हा आशावाद व्यक्त करतो. आदरणीय डॉ. राजेंद्र माने सरांना भावी साहित्यिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देतो.







# डोंबारी (कोल्हाटी) समाज

## भाग -२

**आज डोंबारी समाज व कोल्हाटी समाजामधील अस्पष्ट रेषा पुसली गेली आहे. समाज यांना आज कोल्हाटी याच नावाने ओळखतो. डोंबारी समाजातील काही मंडळी आपले वेगळे अस्तित्व शिल्लक ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. आज अनेक लोक या समाजामधील तमाशा, कला केंद्रामध्ये काम करतात. या कलेला अश्लीलता या नजरेमधून न बघता भगवंताच्या सेवेचे एक माध्यम या नजरेमधून बघितले पाहिजे. या समाजात प्रसिद्ध कलाकार पद्मश्री यमुनाबाई वाईकर होऊन गेल्या. त्या अनेक वर्षे समाजाच्या जातपंचायतच्या प्रमुख होत्या. तसेच कासुबाई कवठेकर व वारुबाई कवठेकर या दोन बहिणीसुद्धा या कलाक्षेत्रात प्रसिद्ध झाल्या.**

**राहुल चव्हाण**

८१४९२०१२१४

डोंबारी ही एक भटकी जमात आहे. तिला कोल्हाटी या नावानेही ओळखले जाते. दोरीवर किंवा वेळूच्या काठीवर नाचणे, चालणे आणि अन्य कसरतीचे खेळ दाखवणे हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. आंध्र प्रदेश व कर्नाटक राज्यांमधून हा समाज महाराष्ट्रात स्थलांतरित झाला अशी समाजात मान्यता आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी माध्यंदिन संहितेत वेळूवर नाच करणाऱ्या (वंशनर्तिन) व्यक्तीचा उल्लेख आहे (३०.२१). यावरून अशा प्रकारचे कसरतीचे खेळ करून दाखवण्यास जमातीची प्राचीनता सिद्ध होते. संगीतरत्नाकर नामक ग्रंथात कोल्हाटिकाचे (कोल्हाटी) वर्णन आढळते (७.१३३०-३१) ते असे-

रज्जूसंचार चतुरश्छुरिकानर्तने कृती ।
शस्त्र सङ:कटसम्पातपटू: कोल्हाटीको मत :।

अर्थ - जो दोरीवर संचार करण्यात निपुण असतो; जो सुरी वर फेकून लीलया (हाताला जखम न होऊ देता) झेलू शकतो आणि जो शस्त्राच्या धोकादायक कसरतीत प्रवीण असतो त्याला कोल्हाटी म्हणतात (भारतीय संस्कृतिकोश खंड -३).

डोंबारी समाज गावागावात जाऊन खेळ, कसरती दाखवून आपला उदरनिर्वाह करीत असे. याशिवाय लाकडाच्या व शिंगांपासून फण्या बनविणे, शिंगापासून झाड, बदक बनवण्याची कला या समाजाजवळ होती. वाई येथील आत्माराम लाखे हे या कलाकुसरीमध्ये प्रसिद्ध कलाकार होते. ते सातारा भागात फनीवाले म्हणून प्रसिद्ध होते. वाई येथील वसंतराव जावळे हेसुद्धा शिंगांपासून, लाकडापासून विविध साहित्य



बनविण्यात तरबेज होते. ते आपले साहित्य महाबळेश्वर इथे जाऊन विकत असत, त्याला कारणसुद्धा होते. तिथे देश व विदेशांमधील अनेक पर्यटक येत असत व हे साहित्य विकत घेऊन त्याला व या कलेला योग्य किंमत देत असत. वसंतराव जावळे यांच्या या कलेवर आधारित बातमी इंग्रजी पेपरमध्ये प्रसिद्ध झाली होती. शिंगांपासून विविध साहित्य बनण्यासाठी हा समाज विविध अवजारांचा उपयोग करायचा. त्यामधील अनेक अवजारे या समाजाने निर्माण केली आहेत. त्यामध्ये करवत, पहार (लोखंडी रॉड, तीन ते चार फुटांचा), पटाश्शी (माप घेण्यासाठी दोरी व त्याला एक लोखंडी तुकडा), वाकास (लाकडाचा त्रिकोणी दांडा व त्याला लोखंडी अनुदार टोक), सामता, कानस, लिखोळा आहे. डोंबारी समाज शिंगापासून विविध वस्तू बनवितात यासंदर्भात एक घटना इतिहासात दर्ज आहे. राजर्षी शाहू महाराज त्यांच्याकडे भटके, विमुक्त, वंचित समाजाचे कैवारी म्हणून बघितले जाते. एके दिवशी डोंबारी समाज व्यक्तींनी शिंगापासून पोपट ठेवण्याचा पिंजरा बनवून शाहू महाराज यांच्या चरणी ठेवला. या कलेवर खूश होऊन शाहू महाराज म्हणाले, मागा, तुम्हाला काय पाहिजे! त्यावर डोंबारी समाजांनी म्हटले, 'आम्हाला काही नको. आम्ही भटकंती करणारी जमात. आज इथे, उद्या तिथे.' शाहू महाराजांनी आग्रह केल्यानंतर डोंबारी समाजांनी राहण्यासाठी थोडी जागा मागितली. त्यावर शाहू महाराज म्हणाले, 'माझ्या राज्यात कुठेही राहा व कितीही जागा घ्या.' त्यानुसार डोंबारी समाजाने कोल्हापूर नगरीतील जागा पकडली. तिला आज शाहू वसाहत डोंबारवाडा या नावाने ओळखतात. आता ही जागा शहराच्या मध्यभागी आली आहे. वरील घटनेवरून राजर्षी शाहू महाराज यांचे भटके, विमुक्त समाजाकडे किती लक्ष होते हे ध्यानात येते. परंतु काळाच्या प्रवाहात आता ही कला लुप्त पावत आहे. या कलेमधील कलाकार फार मोजके आता शिल्लक राहिले आहेत.

भटकंती या समाजाच्या नशिबात पुजली होती. गावागावात जायचे, विविध कसरतीचे खेळ दाखवायचे, त्या बदल्यात धान्य, कपडे घ्यायचे. महिला गावात फण्या व इतर कलाकुसरीचे साहित्य विकत आणि गावात कवायतीचे खेळ दाखवत. त्यामध्ये महिला केसांनी दगड उचलून दाखवत, तर पुरुष मंडळी हाताने दगड फोडणे, दातांनी दगड उचलणे, काठीच्या कसरती दाखविणे, दोरीवर चालणे, विविध कवायती उड्या घेऊन दाखवणे होते. यामध्ये पिचली उडी, कोल्हाटणी उडी, आचिती उडी (हात न टेकवता उडी घेणे), लखाडा (कोल्हाटनी उडी घेऊन उलटी पिचली उडी घेणे), रणगाडा इत्यादी कवायती खेळ हा समाज दाखवत होता. या खेळासोबतच पोटाची खळगी भरण्यासाठी हा समाज भीकसुद्धा मागत होता. एका गावात तीन किंवा चार दिवस झाले की गावचा पाटील किंवा देशमुख डोळे वटारून आपलं बिऱ्हाड हलवायला सांगायचा. तेव्हा हा समाज आपले बिऱ्हाड पुन्हा पाठीवर घेऊन पुढचे गाव जवळ करायचा. अशी भटकंती अनेक पिढ्यांनी केल्यामुळे हा समाज मुख्य प्रवाहापासून खूप लांब राहिला.

संत लखा कोल्हाटी – संपूर्ण डोंबारी (कोल्हाटी) समाज हा संत लखा कोल्हाटी यांना आपला पूर्वज व आराध्य मानतो. संत लखा कोल्हाटी यांचा कालखंड नेमका सांगता येत नाही, परंतु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगात त्यांचा उल्लेख मिळतो.

फिरविले देऊळ जगामाजी ख्याती । नामदेवा हाती दूध प्याला

भरीयेली हंडी नरसीमेहत्याची । धनाजी जाटाची सेते पेरी

मीराबाई साठी पी जो विषाचा प्याला । लख्या कोल्हाट्याचा ढोल पिटी

कबिराचे मागी विणू लागे सेले । मुल उठविले कुंभाराचे

आता तुम्ही दया करा पंढरीराया । तुका विनवी पाया वेळोवेळा ।।



संत तुकाराम महाराज म्हणतात – पंढरीराया तू संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत मीराबाई, संत नरसी मेहता यांच्यासाठी प्रकट झाला आणि संत लखा कोल्हाट्यासाठी तू ढोल वाजवीला. आता आम्हावर दया करा आणि दर्शन द्या. वरील अभंगावरून संत लाखा कोल्हाटी यांची भक्ती अधोरेखित होते. तसेच संत लखा कोल्हाटी यांचा कालखंड संत तुकाराम महाराज यांच्या आधीचा आहे हेसुद्धा सिद्ध होते.

संत लखा कोल्हाटी हे राजस्थानमधील असून ते जगन्नाथाचे परमभक्त होते. जगन्नाथाची सेवा व साधुसंतांची सेवा हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. संत लखा कोल्हाटी यांच्याबाबत माहिती 'मूलभक्ती मालिका ग्रंथ'मध्ये आहे. संत लखा कोल्हाटी हे मुरधरखंड (राजस्थान)मधील असून त्यांचा व्यवसाय ढोल वाजवून कवायती दाखवणे हा होता. गावागावात जाऊन ढोल वाजवून कवायती दाखवून जो पैसा मिळेल त्यामधून साधूसंतांची भोजन, निवास इत्यादी व्यवस्था ते करत व उरलेल्या पैशांमधून आपला प्रपंच चालवत. पत्नीच्या निधनानंतर त्यांची मुलगी, भाऊ व लखा कोल्हाटी हे असे कुटुंब गावागावात जाऊन खेळ दाखवत. एके दिवशी खेळ दाखवताना संत लखा कोल्हाटी ढोल वाजवीत होते व त्यांचा भाऊ दोरीवर कसरतीचे खेळ दाखवीत होता. अचानक त्याचा तोल जाऊन तो खाली पडला व त्यात तो मरण पावला. या दुःखाच्या प्रसंगातून बाहेर पडून, पुढील जीवन व्यापन करण्यासाठी आता काय करावे हा प्रश्न लखा कोल्हाटीपुढे होता. आपण जर कसरतीचे खेळ दाखवले तर दोरीवर कोण चढणार? इत्यादी प्रश्न संत लखा कोल्हाटीच्या पुढे होते. याप्रसंगी साक्षात भगवंत धावत आले व त्यांनी स्वतः दोरीवर चढून खेळ दाखवू लागले. त्यावर संत लखा कोल्हाटी म्हणाले, भगवंत तुम्ही दोरीवर चढू नका, तुम्ही या जगाचे तारणहार आहात, तुम्हाला काही झाले तर या जगाचे कसे होणार. तेव्हा तुम्ही ढोल वाजवा व मी दोरीवर चढतो. भगवंतांनी संत लाखा कोल्हाटीचे म्हणणे ऐकले व स्वतः ढोल वाजवला... अशी घटना वरील ग्रंथामध्ये आली आहे. संत लखा कोल्हाटीच्या या भक्तीमुळे संत तुकाराम महाराजांनी लख्या कोल्हाट्याचा ढोल पिटी असे म्हटले.

मेवाड भागामध्ये जगन्नाथाचे असीम भक्त म्हणून संत लखा कोल्हाटीची प्रसिद्धी होती. संत लखा कोल्हाटीची मुलगी मोठी झाली, परंतु पैशांअभावी तिचे लग्न होत नव्हते. त्या काळात नवरदेवाला दहा गाढवी देण्याची प्रथा होती. आणि संत लाखा कोल्हाटी जे काही पैसे कमवत ते सर्व साधुसंतांच्या सेवेमध्ये खर्च करीत असे. अनेक लोक संत लखा कोल्हाटीला सल्ला देत असत की, मुलीच्या लग्नासाठी भगवंताकडे मदत मागा, परंतु संत लखा कोल्हाटी विनम्रतापूर्वक नकार देत. देवाकडे आपल्या संसारातील समस्या घेऊन जाणे व मदत मागणे हे संत लखा कोल्हाटीला मान्य नव्हते. त्यांची भक्ती असीम व निर्मल होती. ती व्यवहारावर आधारित नव्हती. त्यात सौदा व नफातोटा नव्हता. म्हणून कधीच संत लखा कोल्हाटीने स्वतःसाठी देवाजवळ काही मागितले नाही. या प्रसंगामधून मार्ग काढण्यासाठी स्वतः भगवंतांनी पुढाकार घेतला. राजाच्या स्वप्नात जाऊन त्यांना सांगितले की, माझा भक्त लखा कोल्हाटी या मार्गावरून जात आहे. त्याच्या मुलीच्या लग्नासाठी त्याला आर्थिक मदत करा. त्याप्रमाणे राजाने संत लखा कोल्हाटी यांना मदत केली व त्यामधून पुढे मुलीचा विवाह संपन्न झाला. लखा महाराजांनी जावयाला सांगितले की, माझ्याकडे द्यायला गाढवे नाहीत, फक्त माझी कन्या आहे तिचा आपण स्वीकार करावा... असा उल्लेख मूलभक्तीमालिका ग्रंथात आहे. भगवंतांनी आपल्यावर केलेली कृपा, दिलेले दर्शन, आपल्यासाठी स्वतः ढोल हातात घेणे, आपल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी राजाला दृष्टांत देणे या सर्व घटनाक्रमामुळे संत लखा कोल्हाटीची भक्ती पुन्हा वाढली. या सर्वां प्रति कृतज्ञता म्हणून संत लखा कोल्हाटी यांनी लोटांगण घालत जगन्नाथपुरीला जाण्याचा निर्णय घेतला. संत लखा कोल्हाटी यांनी आपला संकल्प पूर्ण केला व या जगाचा निरोप घेतला.

संत लखा कोल्हाटीला डोंबारी समाज आपला आद्यपुरुष मानतात. तेव्हापासून ढोल वाजवून विविध कवायती दाखवण्याचे काम या समाजाने स्वीकारले, त्यामागची प्रेरणा ही संत लखा कोल्हाटी ही होती. काळाप्रमाणे यात बदल होत गेले. हा समाज अनेक पिढ्या भटकंती करीत राहिला. मुख्यतः हा समाज कर्नाटकामधून बेळगावमार्गे कोल्हापूर येथे स्थलांतरित झाला. १९५० आधी हा समाज सातारा



जिल्ह्यामधील वाई या गावात आला. १९५७ मध्ये विठ्ठल मारुती लाखे यांनी वाई येथे सोसायटी स्थापना केली. परंतु त्यानंतरसुद्धा अनेक वर्षे हा समाज या गावात आला नाही. समाज स्थिर व्हावा, त्यांच्या समस्यांमधून मार्ग निघावा म्हणून विठ्ठल लाखे प्रयत्न करीत होते. त्यांनी वाईमध्ये विहीर बांधण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांना सर्व लोक मेंबर असे म्हणत. त्यांनी कधीच ग्रामपंचायत किंवा नगर परिषद लढवली नाही, ते अशिक्षित होते. परंतु ते समाजाच्या मनातील मेंबर होते. म्हणून संपूर्ण वाई जिल्हा त्यांना मेंबर असे संबोधित होता. विठ्ठल लाखे हे गावागावा जायचे, खेळ दाखवायचे व रात्री डोंबारी समाजाचे जागरण व प्रबोधन करायचे. काय चांगले, काय वाईट समजून सांगायचे. खऱ्या अर्थाने त्यांनी समाजपरिवर्तनाचे कार्य केले.

आज डोंबारी समाज व कोल्हाटी समाजामधील अस्पष्ट रेषा पुसली गेली आहे. समाज यांना आज कोल्हाटी याच नावाने ओळखतो. डोंबारी समाजातील काही मंडळी आपले वेगळे अस्तित्व शिल्लक ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. आज अनेक लोक या समाजामधील तमाशा, कला केंद्रामध्ये काम करतात. या कलेला अश्लीलता या नजरेमधून न बघता भगवंताच्या सेवेचे एक माध्यम या नजरेमधून बघितले पाहिजे. या समाजात प्रसिद्ध कलाकार पद्मश्री यमुनाबाई वाईकर होऊन गेल्या. त्या अनेक वर्षे समाजाच्या जातपंचायतच्या प्रमुख होत्या. तसेच कासुबाई कवठेकर व वारुबाई कवठेकर या दोन बहिणीसुद्धा या कलाक्षेत्रात प्रसिद्ध झाल्या. डोंबारी समाज कर्नाटकमध्ये खानापूर, बेळगाव, संकेश्वर, लिपाणी तर महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर, बावडा, मुरगुड, कागल, इचलकरंजी, तासगाव, आष्टा, मसूर, नातेपुते, लोणंद, जेजुरी, सासवड, पुणे, तळेगाव दाभाडे, कामशेट, दापोडी, खेड, मंचर, सांगली, कवठे, सातारा, कराड, उंब्रज, वाई, रहमतपूर, शिरवळ, कुडाळ, कोरेगाव, एकंब आणि औंध या भागात मोठ्या प्रमाणात आढळतो. काळाच्या प्रवाहात या समाजाच्या कलागुणांना जिवंत ठेवणे हे आपल्या सर्वांचे व शासनाचे कर्तव्य आहे.

महाराष्ट्र प्रांत प्रमुख
भटके विमुक्त विकास परिषद